**अतारांकित प्रश्नोत्तरांची २९ वी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## नागपूर येथील उमरेड-कऱ्हांड अभयारण्यात वाघीण व तिच्या ५ बछड्यांचा रस्ता पर्यटकांनी रोखून धरल्याबाबत

**(१) ८३ (२५-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील उमरेड-कऱ्हांड अभयारण्यात एफ-२ नावाची वाघीण व तिच्या ५ बछड्यांचा रस्त्याचा मार्ग पर्यटकांनी दोन्ही बाजूने रोखल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (१६-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर घटना नागपूर जिल्ह्यातील उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यातील कुही (वन्यजीव) वनपरिक्षेत्रामधील गोठणगांव पर्यटक प्रवेश द्वारवर दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी गोठणगांव पर्यटक प्रवेश द्वार वरील सफारी मार्गावर घडली होती.

(२) संबंधित पर्यटक मार्गदर्शक व जिप्सी चालक यांनी पर्यटन नियमांचे उल्लंघन केल्याने तसेच प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता वनपरिक्षेत्र अधिकारी कुही यांचे दिनांक ०४.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ०३.०१.२०२५ ते ०३.०४.२०२५ या कालावधीकरिता एकूण ४ लोकांवर निलंबनाची कार्यवाही करुन पर्यटक मार्गदर्शक यांचेवर रु.१०००/- व जिप्सी चालक यांचेवर रु.२५०००/- एवढा दंड आकारण्यात आलेला असून त्यांचेवर वन अपराध गुन्हा क्र. २३७७२६/२०२५ दिनांक ०३.०१.२०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर व बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा व उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्य मधील पर्यटक, जिप्सी चालक, मार्गदर्शक यांना जंगल सफारी करण्याबाबत नियमावली जारी करण्यात आली असून त्याअन्वये समितीमार्फत दिशानिर्देश देण्यात आले आहे.

दिनांक १२.०२.२०२५ च्या शासन पत्रान्वये संरक्षित क्षेत्रातील वाघ व पर्यावरणीय व्यवस्थेचे संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे. या घटनेमुळे निसर्ग पर्यटनाचे नियम आणि शिस्त अधिक कडक करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे. त्या अनुषंगाने वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने जंगल सफारीदरम्यान नियम व अटींचे काटेकोरपणे पालन होणे अत्यंत महत्वाचे आहे. याकरिता खालीलप्रमाणे सूचना सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता जारी करण्यात येत आहे.

- सकाळ व दुपारच्या सफारी वेळेत नियमित गस्त घालणे, पर्यटकांना सुरक्षित व शिस्तबध्द सफारी अनुभव देण्यासाठी सकाळ आणि दुपारच्या दोन्ही सफारी दरम्यान पर्यटन मार्गावर गस्त घालणे अनिवार्य आहे.
- नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई, सफारी दरम्यान घालून दिलेल्या नियम व अटींचे पालन न करणारे निसर्ग मार्गदर्शक किंवा जिप्सी चालक आढळल्यास त्यांच्यावर तात्काळ दंडात्मक कारवाई करावी.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य मानवी हक्क आयोगाकडील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२) ११२ (२६-०४-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२२-२३ या वर्षात राज्य मानवी हक्क आयोगाकडे सुमारे २३ हजार ८५० प्रकरणे निर्णयासाठी प्रलंबित असल्याची माहिती विधीमंडळात सादर केलेल्या आयोगाच्या २२ व्या वार्षिक अहवालाद्वारे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानवी हक्क आयोगाकडे प्रलंबित प्रकरणांची वाढती संख्या विचारात घेता, ही प्रकरणे विनाविलंब कार्यवाही करुन निकाली काढण्यासाठी आयोगास लागत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त २३ हजार ८५० प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) आयोगाच्या आस्थापनेवरील अध्यक्ष व सदस्य यांची पदे सन २०२० पूर्वी दीर्घकाळ रिक्त होती. त्या काळात सुनावणीची गती कमी होती. रिक्त पदांवर अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्त्या केल्यानंतर व सन २०२० मध्ये कोविड आजाराचे काळात प्रवास व उपस्थितीवरील निर्बंधामुळे सुनावणीकरिता कमी वेळ मिळाल्याने प्रकरणांची निर्गती होण्याची गती कमी झाली होती.
(३) कोविड काळातील निर्बंध संपल्यावर आयोगाच्या कार्यालयात सुनावणीत प्रत्यक्ष उपस्थित राहून कामकाजात सहभाग घेणे. अर्जदार, प्रतिवादी, शासकीय अधिकारी यांना अद्ययावत तंत्रज्ञानाचा उपयोग करून ऑनलाईन, दृकश्राव्य माध्यमाद्वारे कामकाजात सहभाग घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन्य प्राण्यांना दत्तक योजनेच्या करारातील नुतनीकरणाबाबत

**(३) ३१४ (२६-०४-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पिंजऱ्यात बंद असणाऱ्या प्राण्यांच्या संवर्धनाकरिता सन २०१४ मध्ये वन्यजीव दत्तक योजनेला सुरुवात करण्यात आली असून या योजनेंतर्गत सफारी, बचाव केंद्र व दर्शन पिंजऱ्यांमध्ये असलेले (वाघ, बिबट्या, सिंह, वाघाटी मांजर, नीलगाय व हरिण) या प्राण्यांना दत्तक घेण्याचे आव्हान करुन त्यांचा आहार व उपचार खर्च पालकांना करावा लागतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेनुसार वर्षभरासाठी वाघ (एक लाख दहा रुपये), सिंह (तीन लाख), बिबट्या (एक लाख वीस हजार), वाघाटी मांजर (पन्नास हजार), नीलगाय (तीन हजार) व हरिण (वीस हजार) रुपये अशा स्वरुपाचा खर्च करण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उद्यानातील सध्या वाघ (८), बिबट्या (२०), वाघाटी मांजर (२) व नीलगाय (१) यांचे पालकत्व स्विकारण्यात आले असून दोन वाघ व एक बिबट्या अजूनही पालकांच्या प्रतिक्षेत असून दत्तक करार संपुष्टात आल्यानंतर त्यांच्या नुतनीकरणाचा विचार करत नसल्याची निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दत्तक योजनेंचा पालकत्व करार नुतनीकरण करण्याबाबत तसेच वन्य प्राण्यांच्या संवर्धनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (१६-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रशासनाद्वारे सिंह- रु.३,००,०००/-, वाघ- रु. ३,१०,०००/-, बिबट- रु.१,२०,०००/-, वाघाटी- रु.५०,०००/-, चितळ- रु.२०,०००/-, निलगाय- रू. ३०,०००/- वन्य प्राणी दत्तक योजनेंतर्गत एका वर्षासाठी शुल्क आकारण्यात येते.
(३) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बंदिस्त प्राण्यांपैकी सिंह २, बिबट १ व वाघाटी १ असे एकुण ४ वन्यप्राणी दत्तक योजनेअंतर्गत पालकत्वाच्या प्रतिक्षेत आहेत.
(४) वन्यप्राणी दत्तक योजनेअंतर्गत स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी दोन सिंह दिनांक ०१.०५.२०२४ ते ३०.०४.२०२५ या कालावधी करीता दत्तक घेतले होते. त्या अनुषंगाने स्टेट बँक ऑफ इंडिया यांना अधिक्षक, सिंहविहार, बोरीवली या कार्यालयामार्फत वन्यप्राणी दत्तक कालावधी नुतनीकरण करणेकामी कळविण्यात आले आहे. सदर नुतनीकरण करणेकामी स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे स्तरावर मंजुरीकामी कार्यवाही सुरू आहे. सदर मंजुरी प्राप्त होताच नुतनीकरण करण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल.

तसेच वन्यप्राणी दत्तक योजनेअंतर्गत एक बिबट व एक वाघाटी दत्तक घेणेकामी उपलब्ध आहेत. सदर बिबट व वाघाटी घेणेकरीता रॉयल फॉर्वडेड लि. व करुणा ट्रस्ट मुंबई यांचेशी चर्चा व त्याअनुषंगिक कार्यवाही सुरु आहे. त्यांचे कंपनीमधून मंजुरी प्राप्त होताच दत्तक योजनेबाबत कार्यवाही करणेची दक्षता ठेवलेली आहे.

तर दत्तक करार नुतनीकरण करण्यास पालक इच्छुक नसल्यास इतर पालक जे इच्छुक असतात त्यांचेमार्फत दत्तक योजनेअंतर्गत कार्यवाही केली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अनधिकृत बांधकामे हटविण्याबाबत

**(४) ४८२ (२५-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.महेश सावंत (माहिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात वर्षानुवर्षे राहणाऱ्या रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी संवर्धन कृती ट्रस्ट (C.A.T.) या संस्थेने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन बेकायदेशीर बांधकामे हटविण्याबाबतचे आदेश शासनाला सन १९९७ मध्ये तसेच दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त उद्यानातील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याने या ठिकाणी बेकायदेशीरपणे बाजार भरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे विस्थापित होणाऱ्या हजारो नागरिकांचे संरक्षण करुन पुनर्वसन करण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकामे हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबरची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (१६-०२-२०२६) :** (१) बॉम्बे एनव्हायर्नमेंटल ॲक्शन ग्रुप यांनी दाखल केलेल्या रिट याचिका

क्र.३०५/९५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०७.०५.१९९७ रोजीच्या सुनावणीमध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील दिनांक ०१.०१.१९९५ पूर्वीच्या अतिक्रमकांचे उद्यानाबाहेर पुनर्वसन करुन त्यांचे वनक्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासीत करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानंतर जनहित याचिका क्र.४८/२०२३ व रिट याचिका क्र.३०५/९५ मधील अवमान याचिका क्र.९२३७/२०२४ मधील दिनांक १४.०१.२०२५ रोजीच्या एकत्रित सुनावणीमध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील सर्व अतिक्रमकांचे सर्वेक्षण करुन अपात्र अतिक्रमणांचे निष्कासन करण्याचे आदेश पारीत केले आहेत.
(२), (३) व (४) सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असून, मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बत्तीस शिराळा (जि.सांगली) येथे जिवंत नागाच्या पूजेस घातलेली बंदी उठविण्याबाबत

**(५) २४५१ (२५-०४-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बत्तीस शिराळा (जि.सांगली) या गावातील जगप्रसिध्द नागपंचमीच्या सणाला जिवंत नागाची पूजा करण्यावर कित्येक वर्षापासून शासनाने बंदी घातल्याने स्थानिकांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी परंपरेनुसार नागपंचमी सण उत्साहात साजरा करण्याकरिता स्थानिक नागरिकांकडून परिसरातील जिवंत नाग पकडणे, विधीवत पूजा करणे, नागाच्या जिवीतास कोणतीही इजा न पोहचविणे, नागांना मूळ ठिकाणी सुखरुप सोडणे इ. काळजी घेऊन सोडण्यात येत होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात जिवंत नागाची पूजा पूर्ववत सुरु करण्याकरिता गुरु गोरक्षनाथांचे अनुयायी, अनेक साधु, भक्तगण तसेच शिराळा व पंचक्रोशीतील हजारो ग्रामस्थांनी शासनाकडे आंदोलने करुन तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडे वारंवार निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जलीकट्टू व बैलगाडा शर्यती यास अन्य कायद्याची बाधा न येता ज्याप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली त्याचधर्तीवर हिंदू धर्मातील चालीरितीप्रमाणे नागाची जिवंत पूजा पूर्ववत सुरु होण्यासाठी “क्रीडा प्रकारास” मान्यता देण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (१६-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.
वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ मधील अनुसुचिमध्ये नाग (Indian Cobra) सर्पांचा समावेश असल्यामुळे सदर अधिनियमातील तरतुदी नाग (Indian Cobra) सर्पास लागू होतात.
(२) अंशत: खरे आहे.
मौजे-शिराळा (जि. सांगली) येथील परंपरेनुसार नागपंचमी सणाच्या दरम्यान स्थानिक नागरिकांकडून जीवंत नाग पकडून त्याची पूजा करण्याची प्रथा बऱ्याच वर्षापासून अस्तित्वात होती. सदर पूजेनंतर नाग प्राण्यांची मिरवणूक काढणे, स्पर्धा भरविणे, इत्यादी बाबी निदर्शनास आल्या होत्या. त्या अनुषंगाने वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ आणि उच्च न्यायालय यांच्याकडील आदेशानुसार आरोपींच्यावर वनगुन्हे नोंद झाले आहेत. तसेच जीवंत पकडलेल्या नाग या वन्यप्राण्यांस मोठ्या प्रमाणात इजा होवून मृत्यूमुखी पडत असल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.
(३) हे खरे आहे.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरात अग्निशमन**
**केंद्रामध्ये अनेक त्रुटी असल्याबाबत**

**(६) ३३१२ (२७-०४-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि. कोल्हापूर) शहरात अग्निशमन केंद्रामध्ये अनेक त्रुटी असून अत्याधुनिक यंत्रसामुग्री, आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने शहरात अनेक वेळा आग लागल्याच्या घटना घडल्यावर नागरिकांना अडचणी येत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात संबधित अधिका-यांकडे लेखी निवेदन देऊन तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरातील अग्निशमन केंद्राला अत्यावश्यक सोयी-सुविधा पुरविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२६) :**

(१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) इचलकरंजी महानगरपालिकेडे सद्यस्थितीत २ अग्निशमन वाहने, १ मिनी रेस्क्यू टेंडर अग्निशमन वाहन व २ फायर बुलेट उपलब्ध आहेत. तसेच महानगरपालिकेकडे २ अग्निशमन केंद्रे असून तिसरे अग्निशमन केंद्रासाठी जागा निश्चित करुन अग्निशमन केंद्र बांधण्याचे प्रस्तावित आहे. सन २०२४-२५ च्या प्राप्त निधीमधून अग्निशमन उपकरणांची खरेदी करण्यात आली असून अग्निशमन वाहन खरेदी प्रक्रिया सुरु आहे.

इचलकरंजी महानगरपालिकेमधील अग्निशमन विभागामध्ये एकूण ६६ पदे मंजुर असून ५७ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्याच्या हद्दीत अग्निशमन यंत्रणेसह सुरक्षा सुविधा**
**उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(७) ३३४७ (०१-०५-२०२५). श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग हद्दीमध्ये मागील दोन-तीन वर्षापासून शेकडो वाहनांना आग लागली असतांनाही सदर महामार्गावर अग्निशमन यंत्रणेसह अनेक सुरक्षा सुविधांचा अभाव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर एखादी आगीची घटना घडल्यानंतर बोईसर, पालघर, वसई या ठिकाणाहून अग्निशमन दलाला यावे लागत असून वाहतुकीच्या रांगाच रांगा असल्यामुळे त्यांनाही पोहचण्यास उशीर होत असल्याने महामार्गावर सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महामार्गावर पालघर जिल्ह्याच्या हद्दीत अग्निशमन यंत्रणेसह सुरक्षा सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी लोप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे व महामार्ग प्राधिकरणाकडे करुनही त्याकडे महामार्गा प्राधिकरणाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रवाश्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सदर महार्गावर अग्निशमन यंत्रणेसह इतर सुरक्षा सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२५) :** (१) मुंबई-अहमदाबाद महामार्गावर (नवीन NH-४८) वाहनांना आग लागण्याच्या घटना व्यवस्थापनासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत ०३ पेट्रोलींग वाहने, ०४ रुग्णवाहिका

आणि ०३ क्रेन तैनात करण्यात आली आहेत.

(२) सदर महामार्गावर वाहनाला आग लागल्यास बोईसर, वसई, पालघर इत्यादी जवळच्या ठिकाणाहून अग्निशमन दलाला बोलावण्यात येते.

(३) व (४) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,ठाणे यांच्यामार्फत NH-४८ वर अग्निशमन दलाचा टँकर उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव NHAI मुख्यालयाकडे पाठविण्यात आला होता. तथापि, अग्निशमन दलाचे टँकर देण्याची तरतूद NHAI च्या व्यवस्थापन धोरणात नसल्यामुळे NHAI द्वारे सुविधा प्रदान करता येत नाहीत. आगीच्या घटनांना तोंड देण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत NH-४८ वर अग्निशमन दलाची सेवा पुरविण्यात यावी, असे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने जिल्हा प्रशासनास कळविले आहे.

---

## उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय लातूर येथे जमीन मोजणीकरिता पैशाची मागणी होत असल्याबाबत

**(८) ३३७६ (२८-०४-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय ,लातूर येथील जमीन मोजणी, फेरफार प्रकरण व चुकीची दुरुस्तीसह अन्य कामासाठी कार्यालयात अर्जदाराकडून पैशाची मागणी करणे व आर्थिक पिळवणूक करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर कार्यालयात ई-मोजणी व्हर्जन २ आज्ञावली लागु करणेत आलेली असुन, सदरच्या प्रक्रीयेत शेतकरी/अर्जदार हे ऑनलाईन मोजणी अर्ज करुन त्यांच्या प्रकरणाची सद्यःस्थिती पाहू शकतात. प्रलंबित मोजणी प्रकरणांबाबत साप्ताहीक ऑनलाईन आढावा बैठक होत असल्याने प्रलंबित मोजणी प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात येतात. यामध्ये अर्जदाराची कोणतीही अडवणूक केली जात नाही. तसेच, फेरफार नोंद प्रकरणांमध्ये दूय्यम निबंधक/नोंदणी कार्यालयात दस्त नोंदणी केल्यानंतर ऑटो ट्रिगर (Auto Trigger) प्रणालीद्वारे कार्यालयास ऑनलाईन प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची पडताळणी करुन नियमांतर्गत आवश्यक त्या पुढील कार्यवाहीअंती फेरफार नोंद प्रकरणे निर्गत करण्यात येतात. तसेच वारस नोंदीसह इतर फेरफार हे PDE (Public Deta Entry) ऑनलाईन प्रणालीमध्ये प्राप्त होत असून सदर प्रकरणात नियमांतर्गत पुढील कार्यवाही करण्यात येते. संबधित अर्जदार यांना फेरफाराची व आखीव पत्रीकांची नक्कल ऑनलाईनच घेता येते. त्यामुळे कार्यालयात येण्याची आवश्यकता नसून फेरफार प्रकरणे व चुकांची दुरुस्तीसह अन्य कामासाठी कार्यालयात अर्जदाराकडून पैशाची मागणी करणे, आर्थिक पिळवणूक अशा प्रकारच्या बाबी होत नाहीत.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदन व तक्रार अर्जातील गंभीर स्वरुपाच्या मुद्द्यांच्या अनुषंगाने उप अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर कार्यालयातील संबधीत छाननी लिपीक व शिरस्तेदार या दोन कर्मचाऱ्यांना दिनांक ०७/०१/२०२५ च्या आदेशान्वये शासन सेवेतून "निलंबीत" करण्यात आलेले आहे. तसेच उप अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्याचा प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई मध्ये वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत

**(९) ३४४७ (२३-०४-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पूर्व उपनगरांमध्ये सरकारी वैद्यकीय महाविद्यालये नसल्याने येथे शासकीय सुपर-स्पेशलिटी आरोग्यसेवा सुविधांचा अभाव असुन रूग्णांना तत्काळ उपचारासाठी सायन येथील लोकमान्य टिळक महापालिका जनरल रुग्णालयात पाठवले जाते. या रुग्णालयाच्या १० एकर परिसरात नविन वैद्यकीय महाविद्यालय स्थापनेसाठी भारतीय वैद्यकीय परिषदेच्या सर्व नियमांची पूर्तता होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत, तत्कालीन अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी गोवंडी येथील पंडीत मदन मोहन माल्वीया शताब्दी रूग्णालयाचे वैद्यकीय महाविद्यालयात रूपांतर करण्याचा प्रस्ताव सादर केला होता, त्या अनुषंगाने तत्कालिन उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये महाविद्यालय स्थापनेसाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याची शिफारस केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने राज्य शासनाला जमिनीच्या हस्तांतरणासाठी वेळ लागू शकतो, असे सांगण्यात आले होते आणि महानगरपालिकेले स्वत:च महाविद्यालय स्थापनेसाठी पुढाकार घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१३-१४ पासून सुरू असलेल्या या प्रकल्पाची पूर्तता होण्यासाठी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(५) असल्यास, त्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

पं. मदन मोहन मालवीय शताब्दी २१० रुग्णालय गोवंडी हे सद्यस्थितीत रूग्णाशय्यांचे माध्यमिक आरोग्य सेवा पुरविणारे रुग्णालय आहे. रुग्णालय इमारती जवळ अतिरिक्त मोकळा भूखंड सी. टी. एस - क्र. ३८८ ( क्षेत्रफळ साधारणतः १.५ एकर) हा उपलब्ध असून अशा प्रकारे सद्यस्थितीतील रुग्णालय परिसर (एकूण क्षेत्रफळ ८.३३ एकर) व अतिरिक्त भूखंड असे एकत्रित क्षेत्रफळ साधारणता १० एकर पेक्षा जास्त होईल.

राष्ट्रीय आरोग्य परिषद यांनी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी निकष दिले आहेत.

१) राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेच्या (NMC) मार्गदर्शक नियमानुसार २५ लाख लोकसंख्येसाठी एक वैद्यकीय महाविद्यालयाची शिफारस केलेली आहे.

२) किमान २२० रुग्णशय्येचे ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीस.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) पं. मदन मोहन मालवीय शताब्दी महानगरपालिका रुग्णालय येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणे व सदर वैद्यकीय महाविद्यालय सार्वजनिक खाजगी सहभाग प्रकल्प अंतर्गत स्थापित करण्यासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती मागविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत येणाऱ्या नोकरदार महिलांसाठी निवासाची व्यवस्था करण्याबाबत

**(१०) ३४४८ (२३-०४-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संपूर्ण राज्यातून रोजगारासाठी मुंबईत येणाऱ्या महिलांसाठी निवासाची तरतूद करण्याबाबत शासनाने तसेच, विकास आराखडा-२०३४ अंतर्गत कामकाजी महिलांसाठी राखीव जागेचा विकास करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अणुशक्ती नगर मतदारसंघातील देवनार गावातील न.भू.क्र. १ आणि २ या राखीव जागेच्या

विकासासाठी, तसेच या जागेच्या विकासासंबंधी मंजुरी प्रक्रियेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, कामकाजी महिलांसाठी मुंबईतील इतर राखीव जागांच्या विकासासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) :** (१) मुंबईतील विद्यार्थी आणि नोकरदार/कामकरी महिलांसाठी घरांची नितांत गरज आणि विद्यार्थी व नोकरदार/कामकरी महिलांसाठी वसतिगृह सुविधांची कमतरता विचारात घेता, विद्यार्थी आणि नोकरदार/ कामकरी महिलांसाठी वसतिगृह विकसित करणेकरीता त्यासंबंधी “Building of Students and/or Working Women Hostel” अशी विशेष तरतूद विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये नव्याने विनियम ३३ चे खंड २५ मध्ये समाविष्ट करण्याबाबत शासन नगर विकास विभागाकडील दिनांक२३/०७/२०२४ अधिसूचनेद्वारे सुधारणा करण्यात आली आहे.
(२) अणुशक्ती नगर मतदारसंघामधील मौजे देवनार, न.भू.क्र २ व ३ हे भूखंड बृहन्मुंबई मंजुर विकास योजना २०३४ मध्ये नोकदार महिलांकरिता बहुउद्देशिय गृहनिर्माण (RSA ५.२) तसेच विविध सार्वजनिक प्रयोजनाकरिता आरक्षित आहेत. तसेच सदर भूखंडांची मालकी बृहन्मुंबई महानगरपालिकेची आहे. सदर भुखंडाच्या विकसनाकरिता समुचीत प्राधिकरण बृहन्मुंबई महानगरपालिका आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अहवालात नमूद आहे की, महानगरपालिकेच्या वास्तुशास्त्रज्ञ विभागाने संचालक (नियोजन) यांच्याकडुन प्राप्त सोयी सुविधांनुसार महिलांकरिता बहुउद्देशिय गृहनिर्माण (RSA ५.२) या आरक्षिणा करिता आराखडे बनविले आहेत.

सदर भूखंडावरील इतर आरक्षणाच्या अनुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६.०५.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या आदेशानुसार महापालिका वास्तुशास्त्रज्ञ विभागाने दिनांक ०९.०५.२०२५ रोजीच्या पत्रा अन्वये संचालक नियोजन यांना उर्वरित आरक्षणे म्हणजे महिला व बालसंगोपन केंद्र (RSA ६.१), आधार केंद्र आणि कौशल्य विकास केंद्र (RSA ६.२). वृध्दाश्रम (RSA ४.९) या करिता सोयीसुविधांबाबत विचारणा केलीली आहे.

संचालक (नियोजन) यांच्याकडून उर्वरित आरक्षणांबाबत सोयीसुविधा प्राप्त झाल्यानंतर महापालिका वास्तुशास्त्रज्ञ विभागाकडून सदर भूखंडावरील सर्व आरक्षणांशी निगडीत इमारतीचे आराखडे तयार करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) मुद्दा क्र.१ प्रमाणे व तसेच बृहन्मुंबई मंजुर विकास योजना २०३४ मधील राखीव जागांचे संपादन व विकासन ची जबाबदारी नियोजन प्राधिकरण या नात्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेची आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सादर केलेल्या अहवालानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नोकरदार महिलांकरीता पी/दक्षिण विभाग गोरेगाव येथे पहिले महिला वस्तीगृह सुरू करण्यात आले असून त्यामध्ये सुमारे १७५ बेडची व्यवस्था करण्यात आली आहे.

तसेच एस विभाग, कांजूर गावातील सीटीएस क्र. ६१७/बी/२ येथील महिला वस्तीगृह इमारत तयार करण्याचे कामकाज प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: मराठवाडा क्षेत्रातील नागरिकांना शस्त्र परवाने खातरजमा न करता वितरीत केल्याबाबत

**(११) ३४६० (२७-०४-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस**

**कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक नागरिकांना मा.गृहमंत्री, जिल्हाधिकारी तसेच पोलीस आयुक्त यांच्याकडून शस्त्र परवाना देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषत: मराठवाडा विभागात मोठ्या प्रमाणात शस्त्र परवाने खातरजमा न करताच वितरीत केले असल्याने, यामध्ये गावठी कट्टे वापराचे प्रमाण वाढल्याने उक्तिठकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी राज्यात किती नागरिकांना जिल्हानिहाय शस्त्र परवाने देण्यात आले आहेत, त्यानुषंगाने गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले किती परवानाधारक असून गुन्हेगारी पार्श्वभूमी किंवा ज्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत अशा परवानाधारकांचे परवाने रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०२५) :** (१) हे अशंत: खरे आहे.

शस्त्र नियम, २०१६ च्या नियम ५ नुसार पोलीस आयुक्त आणि जिल्हाधिकारी हे त्यांच्या कार्यक्षेत्रात परवाना प्राधिकारी आहेत. शस्त्र अधिनियम १९५९ मधील कलम १८ व शस्त्र नियम, २०१६ मधील नियम १०५ नुसार राज्य शासन म्हणजेच मा. गृहमंत्री आणि विभागीय आयुक्त हे अपिलिय प्राधिकारी आहेत.

महाराष्ट्र राज्यात जानेवारी २०२५ मध्ये शस्त्र नियम, २०१६ च्या नियम ५ नुसार पोलीस आयुक्त आणि जिल्हाधिकारी या परवाना प्राधिका-यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रांमध्ये नियमानुसार योग्य पडताळणी करून एकूण २९३ शस्त्र परवाने प्रदान केले आहेत.

(२) हे खरे नाही.

मराठवाडा विभागात संबंधित परवाना प्राधिका-यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रांमध्ये नियमानुसार योग्य ती खातरजमा करून जानेवारी, २०२५ मध्ये १५ शस्त्र परवाने प्रदान केले आहेत.

मराठवाडा विभागातील हिंगोली जिल्ह्यामध्ये अवैधपणे गावठी कट्टा वापरल्याप्रकरणी सन २०२४ मध्ये ११ गुन्हे दाखल करण्यात आले असून १३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच, ऑगस्ट २०२५ अखेरपर्यंत ३ गुन्हे दाखल करण्यात आले असून ७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. उपरोक्त सर्व आरोपींविरूद्ध आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. तथापि, सदर प्रकरणी कोणत्याही ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही.

(३) सदर प्रकरणी संपूर्ण राज्यामध्ये संबंधित परवाना प्राधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रांमध्ये नियमानुसार योग्य पडताळणी करून एकूण २९३ शस्त्र परवाने प्रदान केले आहेत.

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या परवानाधारकांवर किंवा ज्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत अशा परवानाधारकांविरूद्ध शस्त्र अधिनियम १९५९ तसेच शस्त्र नियम, २०१६ मधील तरतुदींनुसार आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करून त्यांचे शस्त्र परवाने रद्द करण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कात उद्योजकांच्या समस्याबाबत

**(१२) ३४८४ (२५-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कात उद्योजकांना वन विभागाच्या नियमांमुळे अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यात एक टक्का शासकीय वनजमीन असून ९९ % खाजगी मालकी क्षेत्र असून तेथे अवैध

वृक्षतोड व वाहतूक देखील होत नाही तसेच खैर ह्या प्रजातीच्या प्रक्रियेवर लावलेले नियम, सन २०१४ च्या महाराष्ट्र वन नियमावलीनुसार नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खैर लाकूड हे शेतमाल म्हणून दिनांक १२ मे, २०२३ रोजी जाहीर होऊन त्याबाबतचे राजपत्र प्रसिध्द झाले असून उद्योजकांनी त्याबाबतचा कृषी उत्पन्न बाजार समिती, रत्नागिरी यांचेकडून प्रक्रिया परवाना देखील मिळाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या दोन्ही जिल्ह्यात खैर प्रजातींना कृषी मालाचा दर्जा देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वन विभागाकडून विना परवाना प्रक्रिया केल्याचे गुन्हे मागे घेण्याबाबत तसेच खैर लाकडावर प्रक्रिया करण्यासाठी सुलभ व व्यावसायिक दृष्टीकोनातून अनुकूल नियम लागू होण्याच्या दृष्टीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२४-११-२०२५) :** (१) खैर लाकडापासून कात रुपांतरण करण्यासाठी महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ नुसार राज्यस्तरीय समिती, महाराष्ट्र राज्य यांनी चिपळुण व सावंतवाडी वनविभागातील खैर लाकडापासून कात निर्मिती करणाऱ्या एकूण १०२ कात उद्योगांना मंजुरी दिलेली आहे.

(२) रत्नागिरी जिल्हा (चिपळूण वनविभागाचे) भौगोलिक क्षेत्र हे ८२०८.०० चौ. कि.मी. असून वनक्षेत्र ९६.०३ चौ कि.मी क्षेत्र आहे. त्याचे वनक्षेत्राचे प्रमाण १.१६% टक्के आहे.

महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ अन्वये "चंदन आणि अधिसुचित प्रजातीचे कापणे किंवा घडविणे किंवा तेल काढणे अथवा त्याची भुकटी करणे किंवा इतर कोणत्याही स्वरुपात बदलणे हे काम संबंधित मुख्य वनसंरक्षक यांचे पुर्व लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही" असे नमुद आहे. तसेच खैर (ॲकेशिआ कॅटच्यु) या प्रजातीस अधिसुचित प्रजाती म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे. त्यामुळे राज्य समिती, महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी मंजुरी दिलेल्या कात उद्योगांना खैर लाकडापासुन कात निर्मिती करणेकामी महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ अन्वये मुख्य वनसंरक्षक यांचेकडून परवाना घेणे आवश्यक आहे.

(३) दिनांक १२/०५/२०२३ रोजीच्या अधिसुचनेन्वये रत्नागिरी जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संपुर्ण बाजार क्षेत्रात नियमित शेतमाल खैर लाकुड यांचे नियमन केल्याचे व त्यासाठी संपूर्ण रत्नागिरी जिल्हा सदर शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी बाजार क्षेत्र म्हणून जाहीर केले आहे. मात्र प्रक्रिया परवाना देण्याचे अधिकार हे मुख्य वनसंरक्षक यांचेकडे आहेत.

(४) **सिंधुदूर्ग जिल्हा**-दिनांक०१/१०/२०१२ रोजीच्या अधिसुचनान्वये संपुर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यात शेतमालाच्या खरेदी विक्रीचे नियमन करण्यात आले आहे. सदर यादीमध्ये खैराचे लाकुड समाविष्ट केलेले आहे.

**रत्नागिरी जिल्हा**-दिनांक १२/०५/२०२३ रोजीच्या अधिसुचनेन्वये रत्नागिरी जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संपूर्ण बाजार क्षेत्रात नियमित शेतमाल खैर लाकुड यांचे नियमन केल्याचे व त्यासाठी संपुर्ण रत्नागिरी जिल्हा सदर शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी बाजार क्षेत्र म्हणून जाहीर केले आहे.

(५) व (६) सावंतवाडी वनविभागातील ६ आणि चिपळूण वनविभागातील १६ असे एकूण २२ कात उद्योग हे वनविभागाच्या परवाना/परमिट शिवाय वनउत्पादन तयार करत असल्याचे आढळून आल्याने त्यांचेवर वनगुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. उक्त प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील दिनांक ०३.०१.२०२५ रोजीच्या आदेशान्वये कात उद्योगावर भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये कार्यवाही करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत सर्व वनगुन्हे दंडात्मक कार्यवाही करुन निकाली काढण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र शासनाकडील दिनांक २७/०१/२०२५ रोजीच्या अधिसुचनान्वये महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ मधील तरतुदीमधुन खैर झाडास रत्नागिरी व सिंधुदूर्ग (दोडामार्ग तालुका वगळून) जिल्ह्यांच्या स्थानिक क्षेत्रांना सुट दिलेली आहे.

महाराष्ट्र शासनाकडील दिनांक २६/०३/२०२५ रोजीच्या अधिसुचनान्वये खैर (अंकेशिआ कॅटच्यु), ज्याच्या

इमारती लाकडाचा घेर सर्वाधिक जाडीच्या भागावर पंचवीस सेंटीमीटरपेक्षा अधिक आहे, त्यास अधिसुचित प्रजाती म्हणुन घोषित करणेत आलेले आहे.

---

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्याची निर्मिती होऊनही संजय गांधी योजना विभागास मंजूरी देण्यात आली नसल्याबाबत

**(१३) ३५२३ (२९-०४-२०२५). श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुका निर्मितीला २५ वर्ष होऊनही तालुक्यात संजय गांधी योजना विभागास मंजूरी देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील तहसीलदार कार्यालयात सद्य:स्थितीत महसूल विभागातील कर्मचा-यांची संख्या अपुरी असतांना दुसरीकडे संजय गांधी योजना विभागाचा कारभार महसूली अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत चालविण्यात येत असल्याने अधिकारी व कर्मचारी यांच्यावर अतिरिक्त ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे तालुक्याच्या विकास कामावर परिणाम होत असून सन १९९९ मध्ये अस्तित्वात असलेले विक्रमगड तालुक्याच्या तहसील कार्यालयात मुलभूत सुविधेच्या अभावाबरोबर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अपुऱ्या संख्येमुळे प्रशासनावरही ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तालुक्याकरीता संजय गांधी योजना विभागास मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन विक्रमगड तालुक्यात संजय गांधी योजना विभागास मंजूरी देऊन मनुष्यबळ पुरवठा करण्याच्या तसेच विक्रमगड तहसील कार्यालयातील इतर रिक्त असलेली अधिकारी व कर्मचा-यांची पदे तात्काळ भरण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ (०९-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) राज्यातील गोरगरीब आर्थिक दुर्बल घटकांना तसेच निराधार वृध्द व्यक्तींना दरमहा अर्थसहाय्य देण्यासाठी विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत राज्यपुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना या योजनांच्या अंमलबजावणीकरीता १४२२ पदे तर केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना या योजनांची अंमलबजावणीसाठी ५८४ पदे अशी एकूण २००६ अस्थायी पदे निर्माण करण्यात आली आहेत. विशेष सहाय्य योजनेसाठी स्वतंत्र आस्थापना नाही. सदर पदांच्या आस्थापनाविषयक बाबी महसूल व वन विभागामार्फत हाताळण्यात येतात. सदर अस्थायी पदांना वेळोवेळी शासनाकडून मुदतवाढ देण्यात येते. सदर २००६ अस्थायी पदांचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंध तयार करण्याची कार्यवाही या विभागाकडून सुरु असून, यासंदर्भात प्रस्ताव महसूल व वन विभागाच्या अभिप्रायाकरीता सादर करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात स्पर्धा परीक्षेतील पेपरफुटी व इतर गैरप्रकारांना रोखण्याबाबत

**(१४) ३५२९ (२७-०४-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्पर्धा परीक्षेतील पेपरफुटी व इतर गैरप्रकारांच्या अनुषंगाने उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष किशोर राजे निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने शासनाकडे सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचा अभ्यास करून स्पर्धा परीक्षेतील पेपरफुटी व इतर गैरप्रकारावर आळा घालण्याकरिता कायदा करण्यात यावा व त्याकरिता कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,
(३) तसेच पुण्यात एका उमेदवाराला एमपीएससी च्या परीक्षेचा पेपर चाळीस लाख रुपयाच्या मोबदल्यात मिळेल असा फोन दीपक गायधने, सुमित जाधव आणि योगेंद्र वाघमारे यांनी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन स्पर्धा परीक्षेतील पेपरफुटी व इतर गैरप्रकाराला आळा घालण्याकरिता संबंधीत दोषींवर कारवाई करण्यासह कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१२-२०२५) :** (१) होय, समिती गठीत केली होती, हे खरे आहे.
(२) सदर समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे स्पर्धा परिक्षांमधील अनुचित मार्गास प्रतिबंध करण्यासाठी आणि तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी "महाराष्ट्र स्पर्धा परिक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम, २०२४" पारित करण्यात आला आहे.
(३) होय हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक १ फेब्रुवारी, २०२५ रोजी बंडगार्डन पोलीस ठाणे, पुणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपासाची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जत (जि.सांगली) तालुक्यातील मराठी माध्यमाच्या शाळेच्या मान्यतेबाबत

**(१५) ३५६० (०५-०५-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील सीमा भागातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेच्या मान्यतेबाबतचे प्रस्ताव तालुका बहुजन शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने शासनाकडे सादर करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सन २०११ पासून स्वतंत्र शासन निर्णय काढून सीमा भागातील मराठी नागरीकांकरिता शैक्षणिक सोयी सुविधा व अनुदान देण्याचा निर्णय घेऊनही त्याची अद्यापही अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्यातील विद्यार्थ्यांना मराठी माध्यमिक शाळा नसल्याने मराठी भाषिक भागावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त तालुक्यातील सीमा भागातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेच्या मान्यता देण्याबाबतची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०५-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही,
जत तालुका बहुजन शिक्षण प्रसारक मंडळाकडून मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळा सुरु करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केल्याचे आढळून आले नाही.
(२) राज्यातील ग्रामीण भागातील मराठी - माध्यमाच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळांना परवानगी देण्याकरीता शासन निर्णय, दिनांक १४ जून, २०१२ अन्वये बृहत आराखडा निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार प्राथमिक ६५१, उच्च प्राथमिक १५७९ व माध्यमिक १४२ ठिकाणी म्हणजे एकूण २३७२ ठिकाणांच्या नवीन शाळा सुरु करण्याच्या बृहत आराखडयास शासनाची मान्यता देण्यात आली होती.

तथापि, राज्यात नवीन शाळा सुरु करणे व अस्तित्वात असलेल्या शाळांची दर्जावाढ करण्याबाबत महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ लागू करण्यात आल्याने, शासन निर्णय, दिनांक २ मार्च, २०१७ अन्वये बृहद् आराखड्याच्या अनुषंगाने मागविण्यात आलेले सर्व प्रस्ताव व प्रक्रीया रद्द करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

(३) हे खरे नाही,

सन २०२४-२५ च्या यु-डायसवरील अहवालानुसार जत तालुक्यात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक दर्जाच्या एकूण ६२१ शाळा सुरु असून त्यापैकी माध्यमिक व उच्च माध्यमिकच्या एकूण १२७ शाळा सुरु असल्याचे दिसून आले आहे.

तथापि, संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन), नियम २०१२ नुसार मराठी माध्यमाची नवीन शाळा सुरु करण्याच्या प्रस्ताव सादर केल्यास, निकषानुसार तपासणी करुन नवीन शाळा सुरु करण्यास मान्यता देता येईल.

(४) असे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात स्पर्धा परीक्षा मराठीतून घेण्याबाबतच्या धोरणाची अंमलबजावणी होणेबाबत

**(१६) ३५७२ (२७-०४-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्पर्धा परीक्षा मराठीतून घेण्याचे धोरण शासनाने ठरवलेले असतानाही प्रत्यक्षात अशा परीक्षा मराठी भाषेतून का घेण्यात येत नाहीत, याबाबत औरंगाबाद येथील खंडपीठाने माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये विचारणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कोणत्या कालावधीपासून सदरील कार्यवाही प्रत्यक्षात सुरू करून स्पर्धा परीक्षा मराठीतून घेण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठी भाषेतून स्पर्धा परीक्षा घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०२६) :** (१) मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मराठी भाषेतूनही परीक्षा घेण्याची शक्यता तपासणे व याबाबत धोरण ठरविणे हे अंतरीम आदेश दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी दिले आहेत.

(२) व (३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षा या मराठी व इंग्रजी अशा दोन्ही माध्यमामधून घेतल्या जातात. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या तांत्रिक विषयांच्या वर्णनात्मक परीक्षा मराठी भाषेतून घेण्यासाठी तांत्रिक विषयांची पुस्तके मराठी भाषेतून उपलब्ध होणे आवश्यक आहे. यासाठी तांत्रिक विभागांनी आपल्या अधिपत्याखालील विद्यापीठांना कालबद्ध कार्यक्रम आखून तांत्रिक विषयांचा अभ्यासक्रम मराठी भाषेतून उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना द्याव्यात असे निर्देश देण्यात आले आहेत.

(४) मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी विद्यापीठांच्या दर्जाहीन कामगिरीत सुधारणा करण्याबाबत

**(१७) ३५८२ (२७-०४-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी विद्यापीठांच्या दर्जाहीन कामगिरीबाबत राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क (एन.एस.आर.एफ.) या संस्थेने सर्वोत्कृष्ट विद्यापीठाचा अहवाल प्रकाशित केला असून त्यात राज्यातील एकाही कृषी विद्यापीठाचा समावेश नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शासनाने हजारो कोटी रुपयांचा निधी खर्च करुनही अपेक्षित उद्दिष्ट पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील कृषी विद्यापीठाचा समावेश होऊन त्यांच्या कामगिरीत सुधारणा करण्याबाबत उपाययोजना तसेच संबंधित यंत्रणेविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (२९-०९-२०२५) :** (१) होय,

(२) व (३) सन २०२४ या वर्षात राष्ट्रीय मानांकन संरचना संस्थेने (NIRF) प्रसिध्द केलेल्या मानांकन यादीत राज्यातील कृषि विद्यापीठांचे स्थान तुलनेत घसरले असले तरी, राज्यातील कृषि विद्यापीठांकडून कृषि शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता राखण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. याशिवाय संशोधन व विस्तार शिक्षणामध्ये देखील सातत्य राखण्याच्या दृष्टीने विद्यापीठांकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. विद्यापीठांची जनमानसातील प्रतिमा उंचावण्याकरिता विद्यापीठांच्या उपक्रमांची माहिती प्रसार माध्यमांवर, तसेच सामाजिक माध्यमांवर प्रसृत करण्यात येते.

विद्यापीठांकडून वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत असली तरी, विद्यापीठांची अलीकडच्या कालावधीतील कामगिरी तितकीशी समाधानकारक नसल्याने मानांकन यादीत विद्यापीठांचे मानांकन घसरल्याचे निर्दशनास येते.

राज्य शासनाने सदर बाबीची गंभीर दखल घेतली असून, राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांचा शैक्षणिक, संशोधनात्मक आणि गुणात्मक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांबाबत संबंधित कृषि विद्यापीठांशी समन्वय साधून त्याबाबतचा अहवाल आपल्या शिफारशींसह शासनास तात्काळ सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांना देण्यात आल्या आहेत.

याखेरीज, कृषि विद्यापीठांमध्ये रिक्त असलेली अध्यापकीय पदे व इतर अनुषंगिक पदे भरण्याकरिता या सर्वच विद्यापीठांमधील पदांचा आकृतीबंध अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील पदे भरणेबाबत

**(१८) ३५८९ (२८-०४-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील आवश्यक असलेल्या व मंजूर असणाऱ्या १०८६ पदांपैकी अत्यंल्प पदे भरण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियुक्ती आदेश काढूनही प्रत्यक्षात प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी कामावर रूजू झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यासाठी आवश्यक निधी वर्ग करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर महाविद्यालयात नियुक्ती आदेश काढूनही प्रत्यक्षात रूजू न होणारे प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूध्द कारवाई करणेसह कुशल व अकुशल कर्मचा-यांची पदे भरण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, परभणी या संस्थेत चार वर्षाकरिता नियमित पदे ५६४ व बाह्यस्त्रोताद्वारे ५२२ पदे भरावयाची आहेत. सदर संस्थेत सद्यस्थितीत नियमित प्रथम व द्वितीय वर्षाकरिता मंजूर ३९१ पदापैकी १३ पदे भरण्यात आली असून ३७८ पदे रिक्त आहेत. बाह्यस्त्रोताद्वारे भरावयाच्या पदांमध्ये १८३ पदांपैकी १६४ पदे भरण्यात आली आहेत व १९ पदे रिक्त आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.शासनामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफ़ारशीनुसार फ़ेब्रुवारी २०२५, एप्रिल २०२५, मे २०२५ मध्ये अध्यापकीय संवर्गातील पदावर नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार ०७ उमेदवार रुजू झालेले नाहीत.

(३) परभणी येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे महाविद्यालय तसेच ४३० रुग्ण खाटांच्या रुग्णालयाकरीता रु. ४०३.८९ कोटी इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन निधी वित्तरणाची कार्यवाही सुरु आहे.

(४) राज्यातील शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक (वर्ग-१), सहाय्यक प्राध्यापक व वैद्यकीय अधिकारी (वर्ग-२) या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्तपदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्तपदे भरण्यांची कार्यवाहीही सुरु आहे. सदरील रिक्तपदे नियमित स्वरुपात भरेपर्यंत, रुग्णहित व शैक्षणिक हित विचारात घेऊन, शासन निर्णय दिनांक ०९.०२.२०२२ व २१.०८.२०२४ अन्वये प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे ही कंत्राटी पध्दतीने संचालनालय स्तरावरुन भरण्यांत येत आहेत. त्याचप्रमाणे गट-ब या संवर्गातील सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्तपदे तात्पुरत्या नियुक्तीने विभागीय निवड मंडळामार्फत ३६४ दिवसांकरीता भरण्याबाबत संस्थाप्रमुखांना अधिकार देण्यांत आलेले आहेत. त्यानुसार संस्थास्तरावरुन विभागीय निवड मंडळामार्फत ३६४ दिवसांकरीता सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यांत येत आहेत. गट क संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत संचालनालय स्तरावर स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात येत असून सदर स्पर्धापरीक्षा माध्यमातून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) अभ्यासक्रम सुरू करणेबाबत

**(१९) ३५९२ (०५-०५-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.महेश सावंत (माहिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्यातील शाळांमध्ये अभ्यासक्रमात बदल करण्यात येत असल्यास छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून सीबीएसई पॅटर्न लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सीबीएसई पॅटर्नच्या शाळांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढल्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (एसएससी बोर्ड) शाळांतील प्रवेशसंख्या घटली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एसएससी बोर्डाच्या अभ्यासक्रमास सीबीएसई पॅटर्नच्या समकक्ष करण्यासाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(५) असल्यास, सीबीएसई अंतर्गत उपलब्ध असलेल्या पाठ्यपुस्तकांचे इंग्रजी व हिंदी व्यतिरिक्त मराठी व अन्य प्रादेशिक भाषांमध्ये अनुवाद करून उपलब्धता सुनिश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२१-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) NEP-२०२० ची अंमलबजावणी करण्यासाठी एनसीईआरटीने राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार केला आहे. सदर अभ्यासक्रमाची राज्य स्तरावर अंमलबजावणी करण्यासाठी राज्य अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

राज्यात सन २०२५-२६ पासून राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने नवीन अभ्यासक्रम व पाठ्यक्रमाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करणे बाबत शासन निर्णय दिनांक १४ जुलै, २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. राज्य अभ्यासक्रम आराखडा-२०२४ (शालेय शिक्षण) मधील तरतुदी योग्य त्या बदलांसह टप्प्या-टप्प्याने लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मधील तरतुदीनुसार, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), नवी दिल्ली यांच्यामार्फत राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली पाठ्यपुस्तके, महाराष्ट्र राज्यासाठी आवश्यक असे सर्व बदल करून स्वीकारण्यात येत आहेत. NCERT कडील पाठ्यपुस्तके काळजीपूर्वक तपासण्यात येत असून त्यामध्ये राज्याच्या अनुषंगाने बदल करुन राज्यासाठी पाठ्यपुस्तके बनविण्यात येत आहेत. याबाबत बालभारती व SCERT, Maharashtra संयुक्तपणे कार्यवाही करीत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्राहकांच्या मागणीनुसार अभय योजनेची आणखी एक महिना मुदतवाढ देण्याचा महावितरणाच्या निर्णयाबाबत**

**(२०) ३५९४ (२७-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ६४,४४५ वीज देयकांच्या थकबाकीमुळे ग्राहकांची वीज जोडणी कायम स्वरूपी तोडलेल्या घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी योजना जाहिर केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकबाकीदार ग्राहकांनी सुमारे ८६ कोटी रूपयांचा भरणा केला असून त्यांचे ४४ कोटी ३५ लाख रूपयांचे व्याज व विलंब आकार माफ होण्याकरीता अभय योजनेत मुळ देयकाच्या ३० टक्के रक्कम भरून उर्वरीत ७० टक्के रक्कम सहा हप्त्यात भरावयाची सवलत दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घरगुती, व्यावसायिक व लघुदाब ग्राहक एक रकमी थकीत देयक भरणा करीत असल्यास त्यांना १० टक्के उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत जाहिर केली असून ग्राहकांच्या मागणीनुसार अभय योजनेची आणखी एक महिना मुदतवाढ देण्याचा महावितरणाने निर्णय घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने या योजनेची अधिक क्षमतेने प्रभावी अंमलबाजवणी होण्यासाठी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०१-२०२६) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडीत असलेल्या उच्चदाब व लघुदाब ग्राहकांच्या (कृषी आणि सार्वजनिक पाणी पुरवठा ग्राहक वगळून) थकबाकी वसुली करिता "महावितरण अभय योजना-२०२४" ही योजना सुरु केली होती.

ग्राहकांना थकबाकीची देय रक्कम १००% एक रक्कमी भरण्याचा किंवा किमान ३०% डाऊन पेमेंटसह जास्तीत जास्त ०६ हप्त्यासह भरण्याचा पर्याय उपलब्ध होता.

उच्चदाब ग्राहकांनी मुळ थकबाकी (मुद्दल) एक रक्कमी भरल्यास त्यावर ५% अतिरिक्त सवलत मिळत होती. तसेच

लघुदाब ग्राहकांनी मुळ थकबाकी (मुद्दल) एक रक्कमी भरल्यास त्यावर १०% अतिरिक्त सवलत होती. सदर योजनेचा कालावधी १ सप्टेंबर, २०२४ ते ३० नोव्हेंबर, २०२४ पर्यंत होता. या योजनेचा कालावधी ३१ मार्च, २०२५ पर्यंत वाढविण्यात आलेला होता.
(४) समाजमाध्यमे, वृत्तपत्रे, स्थानिक केबल टीव्ही, होर्डिंग्स तसेच FM रेडीओद्वारे राज्यपातळीवर या योजनेची व्यापक प्रसिद्धी करण्यात आलेली होती कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडीत झालेल्या ग्राहकांना क्षेत्रीय कार्यालयामार्फत नोटीस आणि अभय योजनेची माहिती देण्यात आलेली होती. या शिवाय राज्यपरिवहन मंडळाच्या १००० बस गाडयांवर देखील या योजनेची जाहिरात माहे फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये करण्यात आलेली होती.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी येथे आंतरराष्ट्रीय क्रीडांगण उभारणीबाबत**

**(२१) ३६०६ (२५-०४-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठातील पंचवीस एकर जमीन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडांगणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषी विभागाने ही जमीन क्रीडा विभागाकडे हस्तांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या अधिपत्याखालील मौजे खानापूर, ता.जि. परभणी येथील २५ एकर जमीन विद्यापीठाच्या बीजोत्पादन कार्यक्रमासाठी व पदवी, पदव्युत्तर व पीएचडी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या संशोधन कार्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे ही जमीन परभणी जिल्हा क्रीडा संकुलाकरीता उपलब्ध करुन देणे शक्य नसल्याचे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात राष्ट्रीय दंत आयोगाची अंमलबजावणी करणेबाबत**

**(२२) ३६२० (२८-०४-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या धर्तीवर राष्ट्रीय दंत आयोग स्थापन करण्यात आला असून त्याची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे सध्याच्या भारतीय दंत परिषद (डेंटल कौन्सिल ऑफ इंडिया) रद्द करण्यात आले असून त्या जागी या आयोगामार्फत काम करण्यात येणार असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर राष्ट्रीय दंत आयोगाची शिफारशी लागू झाल्यास राज्यात राज्य दंतवैद्यक परिषद आणि संयुक्त दंतवैद्यक परिषद स्थापना करणे अनिवार्य आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या धर्तीवर स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय दंत आयोगाची राज्यात अंमलबजावणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे
(२) केंद्र शासनाच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(३) सदर कायदा लागू झाल्यापासून राज्यात राज्य दंतवैद्यक परिषद स्थापना करणे अनिवार्य आहे.
(४) राज्यात सदर अधिनियमाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने या विभागाच्या दिनांक १५.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीकडून राष्ट्रीय दंत आयोग अधिनियम, २०२३ मधील तरतूदी विचारात घेऊन नियमांचा मसुदा तयार करण्याची कार्यवाही समितीकडून सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चाफळ (ता.पाटण, जि सातारा) येथे पोलिसाच्या निवासाची व्यवस्था करणेबाबत

**(२३) ३६३९ (२७-०४-२०२५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाफळ (ता.पाटण, जि. सातारा) येथील पोलिस कर्मचाऱ्यांना दुरक्षेत्र निवास व्यवस्था नसल्याने त्यांची अवस्था दयनीय झालेली असून पोलीसांना सद्य:स्थितीत भाविकांसाठी असलेल्या भक्त निवासाचा किंवा धोकादायक बनलेल्या जुन्या इमारतीच्या एका कोपऱ्याचा आसरा घ्यावा लागत असल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०२४ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाफळच्या पोलीस दुरक्षेत्र इमारतीसाठी निधी मिळावा यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला असून सद्य:स्थितीत प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रात्रीच्या वेळी परीसरात एखादी दुर्दैवी घटना घडल्यास, पोलीसांना मल्हारपेठ येथून चाफळपर्यंत धावधाव करावी लागत असून येथे फक्त एक पोलीस उपनिरीक्षक व दोन पोलीस कर्मचारी असा कर्मचारी वर्ग कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून पोलीस निवास व्यवस्था व दूरक्षेत्र इमारतीच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१२-२०२५) :** (१), (२), (३) व (४) चाफळ दूरक्षेत्र येथील पोलीसांची निवासस्थानाची व्यवस्था मल्हारपेठ पोलीस ठाणे या ठिकाणी असलेल्या नविन शासकीय निवासस्थानामध्ये करण्यात आली आहे. तसेच निवास्थानालगत असलेली चाफळ दुरक्षेत्राची कार्यालयीन कामाकाजाची इमारत व्यवस्थित आहे. मल्हारपेठ पो. ठाणे अंतर्गत चाफळ दुरक्षेत्र या ठिकाणी एक पोलीस उपनिरीक्षक व एक पोलीस अमंलदार नेमण्यात आले असून सदरचे मनुष्यबळ पुरेसे आहे. या प्रकरणी प्रस्ताव सादर करण्याची पुढील कार्यवाही पोलीस घटकाकडून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पारोळा (जि.जळगाव) तालुक्यातील मंडळ कृषी अधिकारी कार्यालयातील रिक्त पदांबाबत

**(२४) ३८७४ (२७-०४-२०२५). श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारोळा (जि.जळगाव) तालुक्यातील २ मंडळ कृषी अधिकाऱ्यांची व २७ कृषी सहाय्यकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी विभागातील रिक्त पदांमुळे शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध योजना राबविण्यास गैरसोयीचे होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन रिक्त पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली

वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (२३-१२-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

पारोळा जि. जळगांव तालुक्यात मंडळ कृषि अधिकारी या संवर्गाची ४ पदे मंजूर आहेत. सद्यस्थितीत ३ मंडळ कृषि अधिकारी कार्यरत असून १ रिक्त आहे.

कृषि सहायकांची ३७ पदे मंजूर असून ऑक्टोबर, २०२५, अखेर पर्यंत २५ पदे भरलेली असून १२ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचे कामकाज कार्यरत कर्मचाऱ्यांकडे अतिरिक्त स्वरुपात सोपविण्यात येऊन शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत.

(३) कृषि विभागाचा आकृतीबंध हा सन २००९ मधील आहे. सुधारित आकृतीबंध मंजूर नसल्याने पदभरती करण्यासाठी वित्त विभागाचे निर्बंध आहेत. विभागाचा आकृतीबंध सुधारित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु असून, सुधारित आकृतीबंध झाल्यानंतर पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड नगरपरिषद अंतर्गत सोलार हायमास्ट बसविण्याच्या कामात**
**झालेल्या अनियमिततेबाबत**

**(२५) ३८८६ (०१-०५-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड नगरपरिषद अंतर्गत सोलार हायमास्ट बसविणेबाबत त्या त्या क्षेत्रात काम करणाऱ्या एजन्सीची नांवे देण्यांत येऊन दिनांक १० नोव्हेंबर, २०२४ नुसार शासनाने, अंदाजपत्रकात तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंत्राटदारांनी केलेल्या कामातील अनियमितता व कामाच्या निकृष्ट दर्जाबाबत नागरिकांकडून अनेक तक्रारीही प्राप्त झालेल्या असतांना काही ठराविकच कंत्राटदारांनाच कामे देण्यांत आलेली असल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांच्या तक्रारीनुसार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रकरणाधीन बाबींची स्तरनिहाय कामाची चौकशी करण्याबाबतचे निवेदन मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, तसेच आयुक्त तथा संचालक, न.प.सं.नवी मुंबई यांना दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-१२-२०२५) :** (१) बीड नगरपरिषदेमध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत बीड शहरात सोलार हायमास्ट बसविण्याच्या कामाकरीता जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक २८.०९.२०२४ रोजीच्या आदेशान्वये रु.५.२५ कोटी इतक्या रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, दिनांक ०७.०३.२०२५ व दिनांक ११.०७.२०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये नियमोचित कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड नगरपरिषदेअंतर्गत करण्यात येणाऱ्या विकास कामांतील अडचणी सोडविण्याबाबत**

**(२६) ३८८७ (०१-०५-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड नगरपरिषदेंतर्गत विविध विकास कामे करतांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व अन्य सर्व विभाग प्रमुख यांचे समवेत नगरपरिषदेमध्ये दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी न.प.फंड व इतर लेखाशीर्षअंतर्गत झालेल्या विकास कामांच्या संचिका नगरपरिषदे पुढे अद्याप ठेवण्यात आल्या नसल्याचे तसेच नगरपरिषदेच्या वतीने सोलार हायमास्ट बसवून त्यांचे पॉईट कशाचे आधारे घेण्यात आले याबाबतचा तपशील दिला नसल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याप्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यांत आली आहे काय, त्यानुसार संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-१२-२०२५) :** (१) अंशत खरे आहे,

मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक १६.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार दिनांक २०.०१.२०२५ रोजी मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे,

सदर बैठकीदरम्यान नगरपरिषद फंड व इतर लेखाशिर्ष अंतर्गत झालेल्या विकास कामांच्या संचिका व सोलार हायमास्ट बाबतचे सर्व कागदपत्रे देण्याबाबत तोंडी सूचना दिल्या. तथापि, सर्व कामांची माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने, नेमकी कोणती माहिती अभिप्रेत आहे याबाबत बोध होत नसल्याने, सदरची माहिती बैठकीमध्ये सादर करण्यात आली नव्हती.

तद्नंतर मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या मागणीनुसार सोलार हायमास्टबाबतची संपूर्ण माहिती GPS फोटोसहित दिनांक ०६.०२.२०२५ रोजी मेलद्वारे पुरविण्यात आली आहे. तसेच नगरपरिषद फंडाच्या संचिकेबाबतची माहिती नगरपरिषदेने दिनांक १७.०३.२०२५, दिनांक १९.०३.२०२५ व दिनांक ०९.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अणुशक्ति नगर (मुंबई) मतदारसंघातील ट्रॉम्बे जेट्टीचा विकास आणि मच्छीमारांच्या सुविधाबाबत.**

**(२७) ३९१८ (२८-०४-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अणुशक्तिनगर येथील ट्रॉम्बे जेट्टी येथे मच्छीमार मोठ्या प्रमाणात मासेमारी करतात, सदर जेट्टीच्या विकासासाठी शासनाकडून योजना आखण्यात आली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जेट्टीच्या सुधारणेसाठी आणि मच्छीमारांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी कोणती पायाभूत कामे प्रस्तावित आहेत ,

(३) असल्यास, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मार्फत ट्रॉम्बे जेट्टी विस्तारीकरणासाठी दगडाचा भराव करण्यात येत असून अथवा दगडाचा भराव न करता पायलिंग करून जेट्टी विस्तारीकरणाचा विचार केला गेला आहे काय,

(४) असल्यास, मच्छीमारांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या व्यवसायाच्या वाढीसाठी ट्रॉम्बे जेट्टीचे आधुनिकीकरण करणे आवश्यक असून त्यात कोल्ड स्टोरेज, आधुनिक मासेमारी गोडाऊन, साठवणुकीसाठी जागा व बोटींची देखभाल केंद्र इत्यादी सोयी उपलब्ध करण्यात येणार आहेत काय,
(५) असल्यास, शासनाने मत्स्य व्यवसायाच्या प्रगतीसाठी आणि कोळी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी धोरण ठरवले आहे काय,
(६) असल्यास, ट्रॉम्बे जेट्टीसह संपूर्ण मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी भविष्यात योजना राबविण्यात येणार आहेत काय,
(७) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नितेश राणे (०९-१२-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. सदर जेट्टीच्या सर्वकष प्रकल्प अहवालामध्ये जेट्टीची ३०० मी.लांबी वाढविणे, Pile Jetty, Sloping Hard आणि प्रस्तावित जागी मुलभूत सुविधांचा समावेश आहे.जसे की,जाळी विणकाम गृह, सार्वजनिक शौचालय, विद्युतीकरण, पाणी पुरवठा व अंतर्गत रस्ते इ.बाबीचा समावेश आहे.
(३) व (४) महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळामार्फत पाईल जेट्टीचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. तसेच कोल्ड स्टोरेज,आधुनिक मासेमारी गोडाऊन, साठवणुकीसाठी जागा व बोटीची देखभाल केंद्र इत्यादी सोयी हया टप्पा २ मध्ये घेण्यात येणार आहेत.
(५) व (६) नाबार्ड मालिका ३१ अंतर्गत ट्रॉम्बे जेट्टी विकास करण्याबाबतचा रु.६०.९५ कोटी इतका रकमेचा प्रस्ताव मंजूरीसाठी नाबार्डकडे सादर करण्यात आला आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सायन-पनवेल महामार्गावरील मानखुर्द परिसरातील कांदळवनाच्या संरक्षणाबाबत**

**(२८) ३९२० (०१-०५-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सायन-पनवेल महामार्गालगत मानखुर्द परिसरात रात्रीच्या वेळेस अनधिकृतपणे डेब्रिज डम्पिंग टाकला जात असल्याने संवेदनशील कांदळवनचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच कांदळवन क्षेत्राचे संरक्षण करुन कुंपण (फेन्सिंग) उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत कचरा टाकण्यास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (०१-१२-२०२५) :** (१), (२), व (३) सायन-पनवेल महामार्गालगत मानखुर्द परिसरात रात्रीच्या वेळेस अनधिकृतपणे डेब्रिज डंम्पिंग टाकला जात असल्याचे निदर्शनास आल्याने वनक्षेत्रपाल ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य, ऐरोली यांच्या स्तरावरुन त्या त्या वेळी वनगुन्हे नोंद करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे दिनांक ८/०४/२०२४ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिनिधी, वनपरिक्षेत्र अधिकारी मध्य मुंबई आणि ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य ऐरोली यांनी संयुक्त स्थळपहाणी करुन महामार्गाच्या अखत्यारीतील जागेत संरक्षक जाळी बसविणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आल्याने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दिनांक १६/०४/२०२४ च्या पत्रान्वये संरक्षक जाळी बसविण्याकरिता ना हरकत प्रमाणपत्रासाठी विनंती करण्यात आली. सदरचे क्षेत्र हे ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रापैकी असल्याने ESZ संनियंत्रण समितीकडून परवानगीअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

कांदळवन क्षेत्राच्या संरक्षणाकरिता अधिसूचीत क्षेत्राच्या संवेदनशील हद्दीवर काही ठिकाणी संरक्षक भिंतीचे काम

सुरु असून काही ठिकाणी प्रस्तावित आहे. तसेच सदर क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता क्षेत्रिय अधिकारी, कर्मचारी महाराष्ट्र सुरक्षा बल वेळोवेळी यांच्यासमवेत गस्त घालण्यात येत असते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील कांदळवन क्षेत्रातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याबाबत

**(२९) ३९२४ (२५-०४-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील चिता कॅम्प ट्रॉम्बे येथील खाडी परिसरात वन विभाग महानगरपालिकेस कचरा साफ करण्यास परवानगी देत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात कचरा साचतो तसेच वन विभागाद्वारे सदर कचरा साफ करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कचरा वेळेवर न उचलल्याने तो अधिक साचून खाडी व पर्यावरणास हानी पोहचते, त्यानुषंगाने वनविभाग आणि महानगरपालिका यांच्या संयुक्त समन्वयाने वेळेवर कचरा साफसफाई करण्यासाठी कार्यपद्धती ठरविण्यात येत आहे काय,
(३) असल्यास, नागरिक राहतात त्या वसाहतींना लागून असलेल्या कांदळवन क्षेत्रातील कचऱ्याची नियमित साफसफाई करण्यासाठी वन विभागामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कांदळवन क्षेत्रातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी कोणते धोरणात्मक निर्णय घेतले वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (०१-१२-२०२५) :** (१), (२), (३) व (४) चिताकॅम्प परिसरातील परिमंडळ तुर्भे कडील न.भू.क्र. १० पै सर्व्हे क्र. १५२ पै क्षेत्र १३.०९ हे. आणि न.भू.क्र.५०७ मधील १२५.७५ हे.आर क्षेत्र अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्र असून ते वन विभागाच्या अखत्यारीत आहे. अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्रातील कचरा व्यवस्थापनाकरिता उपाययोजना करण्यात येत आहेत.

सदर चिता कॅम्प परिसर व ट्रॉम्बे जेट्टी कडे जाणाऱ्या रस्त्यालगतच्या कांदळवन क्षेत्रात भरती ओहोटीमधून आलेला कचरा जानेवारी २०२५ पासून मजूरांच्या सहाय्याने गोळा करुन बृहमुंबई महानगरपालिका यांच्याकडे विल्हेवाट लावण्याकरिता हस्तांतरीत करण्यात आला आहे. तसेच प्रस्तूत क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार संरक्षित भिंत/जाळी उभारण्याचे प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे या क्षेत्रातील डेब्रीज भराव पुर्णपणे काढून बृहनमुंबई महानगरपालिका यांच्याकडे योग्य ती विल्हेवाट लावण्याकरिता नियोजीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे मुक्ताईनगर (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव ) येथील श्री.विनोद नामदेव सोनवणे यांनी घरकुलाचा लाभ घेऊन केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३०) ३९७२ (२४-०४-२०२५). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मुक्ताईनगर (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथील श्री.विनोद नामदेव सोनवणे, (प्रो. योगराज कंन्स्ट्रक्शन /योगराज इन्फ्रास्ट्रक्चर, मुक्ताईनगर) यांनी सन २०१४-१५ मध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ घेऊन केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनावर तत्कालिन ग्रामविकास मंत्री यांनी प्र.स.(ग्रा.वि.) चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिनांक २ जुलै, २०२४ रोजी वा त्या सुमारास दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशानुसार या प्रकरणाचा चौकशी अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, शासनाने त्यानुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१९-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांचे अहवालानुसार -
• लाभार्थी सोडून इतरांवर कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही.
• संबंधित लाभार्थी यांना वितरीत करण्यात आलेला प्रथम हप्ता रक्कम रु. ३५,०००/- चा भरणा पंचायत समिती, मुक्ताईनगर या कार्यालयाकडे रोख स्वरुपात दिनांक ०६/०९/२०१६ रोजी केला आहे.
• सदर लाभार्थ्याचे नाव इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१४-१५ च्या यादीतून वगळले आहे. तसेच, SECC-२०११ व आवास प्लस-२०१८ च्या यादीमध्ये सदर लाभार्थ्याचा समावेश नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यातील कुऱ्हा परिसरात पोलिस ठाण्याची निर्मिती करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३१) ३९७७ (२७-०४-२०२५). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यातील कुऱ्हा परिसरातील ४२ गावे, लगत असलेली मध्यप्रदेश व विदर्भाची सिमारेषा तसेच वडोदा वनपरिक्षेत्रातील विस्तीर्ण क्षेत्रात गोरगरीब आदिवासी कुटुंबाचे वास्तव्य असून या परिसरात मांडूळ तस्करी, वन्य जीवांची व त्यांच्या अवयवांची तस्करी, रस्ता लूट या सारख्या गुन्हयांचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागात कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता कुऱ्हा दूरक्षेत्र पोलिस ठाण्याची निर्मिती करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करून या संदर्भात शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रस्ताव मंजूर करण्यांसदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०२६) :** (१) मुक्ताईनगर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात सन २०२३ मध्ये भाग ५ सदरातील २९४ गुन्हे दाखल असून सन २०२४ मध्ये २७१ गुन्हे दाखल झालेले आहेत. तसेच भाग ५ (स्थानिक कायदे) सदरात सन २०२३ मध्ये १७३ गुन्हे दाखल असून सन २०२४ मध्ये १७२ गुन्हे दाखल आहेत. सन २०२३ चे तुलनेत सन २०२४ मध्ये गुन्ह्यांमध्ये घट झालेली आहे.

तसेच कुऱ्हा काकोडा दुरक्षेत्र हद्दीत सन २०२३ मध्ये भाग ५ सदरातील २७ गुन्हे दाखल असून सन २०२४ मध्ये २१ गुन्हे दाखल झालेले आहेत. तसेच भाग ५ (स्थानिक कायदे) सदरात सन २०२३ मध्ये ३८ गुन्हे दाखल असून सन २०२४ मध्ये ५४ गुन्हे दाखल आहेत.
(२) व (३) पोलीस अधीक्षक, जळगाव यांच्याकडून कुऱ्हा पोलीस ठाणे निर्मितीचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. तथापि, सदर प्रस्ताव शासन निर्णय दिनांक २५.०८.२०२३ अन्वये विहित केलेल्या निकषाप्रमाणे नसल्याने सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत २६.०६.२०२४ रोजीच्या शासन पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेवस, बोडणी, कुंडलिका खाडी, उरण व थळ (जि. रायगड) या ठिकाणांवरील समुद्र व खाडीमधील डिझेलची तस्करी रोखण्याबाबत**

**(३२) ४००७ (२९-०४-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवस, बोडणी, कुंडलिका खाडी, उरण व थळ (जि.रायगड) या ठिकाणी डिझेल माफियांनी डिझेलची तस्करी करुन समुद्र व खाडीमध्ये मच्छिमार करणाऱ्या मोठ्या बोट मालकांना कमी भावाने डिझेल दिल्यामुळे राज्याच्या करोडो रुपयाच्या महसूलाचे आर्थिक नुकसान होत असल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डिझेल तस्करीमुळे मच्छिमारांच्या जाळ्या तुटणे, बोटींना अडथळा आणणे व गरीब मच्छिमारांना मारहाण करुन धमकी देण्यात येणे असे प्रकार टाळण्यासाठी येथील स्थानिक मच्छिमार संघटनांनी कोकण किनारपट्टीचे रक्षण करण्यासाठी सर्व बंदरावर सीसीटीव्ही लावण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाला पाठविण्यात आलेल्या अहवालाचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार केंद्र व राज्य शासनाने समन्वयाने तस्करीचे रॅकेट समुळ नष्ट करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (०९-०१-२०२६) :** (१) हे अशत: खरे आहे.

डिझेल तस्करीबाबत कस्टम व सागरी पोलीस विभागामार्फत कारवाई करण्यात येते. त्यानुषंगाने दिनांक १७/१०/२०२४ रोजी रेवस जेट्टी येथे ३३००० लिटर अवैध साठा पोलीस विभागाकडून जप्त करण्यात आला आहे. सदरहू नौका जप्त असून नौका मालक श्री. मोरेश्वर नाखवा यांच्यावर FIR दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सी.सी. टी.व्ही. लावण्याची मागणी प्राप्त नाही. मच्छिमार नौका मालकांनी तस्करीद्वारे मिळणारे डिझेल मासेमारी नौकांसाठी घेऊन वापरू नये यासाठी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड यांनी मच्छिमार सहकारी संस्थांना कळविले आहे. तसेच डिझेल तस्करीच्या अनुषंगाने सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड कार्यालयाने भारतीय तटरक्षक दल, मुरुड यांना माहिती कळविली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अर्जुनी मोर (जि. गोंदिया) तालुक्यातील धाबेटेकडी-अर्जुनी मोर-सुकळी-गोठणगाव नवेगाव या रस्त्याची रुंदी वाढविण्याबाबत**

**(३३) ४०९६ (२८-०४-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी मोर (जि. गोंदिया) तालुक्यातील रा.मा.३५० वर धाबेटेकडी-अर्जुनी मोर-सुकळी-गोठणगाव नवेगाव या रस्त्यावरील कि.मी ४०/०० ते ६२/२५०-२२.२५० किमी लांबीचा रस्ता १९८० पुर्वीचे सर्वे ऑफ इंडियाचे टोपेशीटवर ७.५० मी रुंदीचा असतांना फक्त ३.७५ मीटर रुंदीचा तयार करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर रहदारी असतांना सदरचे काम कंत्राटदाराला १० वर्षे देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात आल्यामुळे पुढील १० वर्षात कोणतीही रुंदी वाढणार नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागात मोठ्या प्रमाणात भविष्यात वाढणारी वाहतूक लक्षात घेता ३.७५ मीटर रस्ता अतिशय अरुंद होत असल्यामुळे तो किमान ५.५० मीटर रुंदीचा रस्ता बनविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य, पायाभूत विकास महामंडळ मर्या. मुंबई यांना जानेवारी, २०२५ मध्ये लेखी निवेदन दिले आहे, हेही खरे आहे काय,

(४) तसेच या रस्त्याचे काम करण्यास व विभागाची परवानगी घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीचा अनुषंगाने या रस्त्याचे काम ५.५ मीटर करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२५-०९-२०२५) :** (१) व (२) गोंदिया जिल्हयातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सिंदपुरी आसगाव लाखांदूर पिंपळगाव अर्जुनी/ मोरगाव सुकडी गोठणगाव (रा.मा.३५४) या रस्त्याची सुधारणा करण्याचे काम हायब्रिड ॲन्युईटी अंतर्गत मंजूर असून महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत करण्यात येत आहे. सदर रस्त्याची वनक्षेत्रातुन जात असलेल्या लांबीत अस्तित्वात असलेल्या रुंदीमध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे प्रस्तावित आहे. प्रकल्पाच्या करारनाम्यातील तरतुदीनुसार देखभाल व दुरुस्तीचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) दिनांक १५.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रस्त्याच्या कामास शासन मंजूरी तसेच वनसंरक्षक नागपूर मंडळ, नागपूर यांनी दिनांक ११.०७.२०२५ व दिनांक १५.०७.२०२५ अन्वये परवानगी देण्यात आली आहे.
(५) सदर प्रकल्प कामाची एकूण लांबी ४२.४९ कि.मी. असून यापैकी वनहद्दीच्या बाहेरील लांबी २०.२० कि.मी. असून रस्त्याचे ५.५० मी.रुंदीचे काँक्रिटीकरणाचे काम मंजूर असून ते प्रगतीत आहे. वनहद्दीत असलेल्या २२.२९ कि.मी. लांबीपैकी २.५० कि.मी. लांबीचे डांबरीकरण ५.५० मी.रुंदीत प्रस्तावित असून प्रगतीत आहे. तसेच उर्वरित १९.७४ कि.मी. वनहद्दीतील लांबीतील वनखात्याच्या मंजूरीनुसार डांबरीकरणाचे काम अस्तित्वात असलेल्या ३.७५ मी. रुंदीमध्ये प्रस्तावित असून प्रगतीत आहे. तथापि, वनहद्दीतील ३.७५ मीटर ऐवजी ५.५० मी. रुंदीचे रस्त्याचे काम वन विभागाच्या मंजूरी नंतर निधी, निकष व व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

## राज्यात बार्टी, सारथी, महाज्योती व टिआरटिआयचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना असामाजिक संघटनेकडून मानसिक व आर्थिक त्रास देत असल्याबाबत

**(३४) ४१०९ (२५-०४-२०२५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बार्टी, सारथी, महाज्योती व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टिआरटिआय) या संस्थेमार्फत पुणे येथे यूपीएससी व एमपीएससीयासह विविध स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देण्यात येत असून या प्रशिक्षणासाठी विदर्भातील ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा असोसिएशन व स्पर्धा परीक्षा समन्वय समितीसारख्या नोंदणी नसलेल्या विद्यार्थी संघटनेकडून मानसिक व आर्थिक त्रास देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे येथे प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शासनाकडून विद्यावेतन देण्यात येत असून ते वेतन सदर विद्यार्थी संघटनेकडून धमकावून व सक्तीने त्यांच्याकडून वसूल करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई तसेच ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना सुरक्षेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलाबांची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (३०-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही,
प्रशिक्षणार्थीना दर महिन्याचे विद्यावेतन हे त्यांच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे अदा करण्यात येते.
(३) महाज्योतीच्या विविध स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा संघटनेद्वारे त्रास देण्यात येत असल्याची तक्रार महाज्योती कार्यालयास प्राप्त होताच तक्रारीची चौकशी करण्याकरिता महाज्योती कार्यालयात तक्रार समिती गठीत

केलेली आहे व सदर तक्रारीची चौकशी करणे सुरू आहे. तसेच, महाज्योती संस्थेसोबत कार्यरत असलेल्या सर्व प्रशिक्षण संस्थांना देखील प्रशिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांच्या उपाययोजनेकरिता प्रत्येक प्रशिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांकरिता तक्रार निवारण कक्ष गठीत करण्याकरिता व तक्रार पेटी उपलब्ध करुन देण्याकरिता तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोणातून प्रशिक्षण संस्थेस सुरक्षा रक्षक म्हणून नेमण्याकरिता पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार(जि.पालघर) येथील महानगरपालिका क्षेत्रातील राज्य मार्गाच्या दुरूस्तीबाबत

**(३५) ४१४५ (०१-०५-२०२५). श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील राज्य मार्ग क्र. ८३ चे ५.२० (कि.मी. २३/५०० ते २८/७००) लांबीचा रस्ता रवियो-२०२४/प्र.क्र.०९/नियोजन-२ मंत्रालय, मुंबई दिनांक ११ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयानुसार महापालिकेकडे हस्तांतरण करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरावस्था झाली असुन दूतर्फा गटार व्यवस्था तसेच देखभाल दुरूस्ती करणे महापालिकेची जबाबदारी असताना महानगरपालिकेकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन गटार देखभाल दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२५) :** (१) खरे आहे.
(२) व (३) खरे आहे.
रस्त्यालगत दोन्ही बाजूस गटार व्यवस्था अस्तित्वात नाही. तथापि, विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत सदर रस्त्याच्या कॉक्रिटीकरण व दोन्ही बाजूस गटार व्यवस्था करण्यासाठी महापालिकेतर्फे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर केला आहे. रस्ता दुरूस्तीचे काम आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरूपात महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी करण्यात येते. सदर ५.२० कि.मी. रस्त्यापैकी जुचंद्र येथील रेल्वे फाटक (LC-०९) वर १३०० मी. लांबीच्या उड्डाणपुलाचे काम व त्याखालील अस्तित्वातील रस्ता, सेवारस्ता व लगत गटाराचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सध्या सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाचोरा (जि. जळगाव) तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालय नव्याने चाळीसगांवसाठी सुरु करण्याबाबत

**(३६) ४१४७ (३०-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा (जि. जळगाव) तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालय नव्याने पाचोरा, भडगांव, चाळीसगांवसाठी सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी व दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी मा. मुख्यमंत्री, तसेच पर्यटन मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या लेखी निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१०-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पाचोरा, भडगांव व चाळीसगांव येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप विभागीय कार्यालये पूर्वीपासून कार्यान्वित आहेत. त्यामुळे पाचोरा येथे पुन्हा नव्याने विभागीय कार्यालय स्थापन करणे उचित होणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बांबरुड, शिंदाड व बाळद (ता.पाचोरा, जि. जळगांव) येथील परिसराचा प्रादेशिक पर्यटनांतर्गत विकास करण्याबाबत**

**(३७) ४१५३ (०८-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बांबरुड (ता.पाचोरा, जि. जळगांव) येथील महादेव मंदिर परिसराचा व गिरणा-तितूर त्रिवेणी संगम तसेच शिंदाड येथील गणपती मंदिर व बाळद येथील पुरातन महेंद्रस्वामी परिसराचा प्रादेशिक पर्यटनांतर्गत विकास करण्याकरिता मंजूरी देऊन निधी मिळणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा. पर्यटन मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त निवेदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (१६-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत प्राप्त होणारे पर्यटन विकासाचे प्रस्ताव, राज्य पर्यटन विकास समितीच्या मान्यतेस्तव सादर केले जातात. त्यानुसार पर्यटन विभागाच्या दिनांक १०/११/२०२३ च्या दोन शासन निर्णयांन्वये पाचोरा तालुक्यातील बांबरुड येथील दुर्गामाता मंदिर, खंडोबा महाराज देवस्थान व शिंदाडे येथील श्रीराम मंदिर तसेच, बाळद येथील महेंद्रस्वामी मंदिर इ. मंदिरांसह अन्य मंदिर परिसरात पर्यटन विकास कामांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील निराधारांच्या विविध मागण्यांबाबत**

**(३८) ४१५४ (०५-०५-२०२५). श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील निराधारांना रुपये १५००/- इतके तुटपुंजे अनुदान मिळत असल्याने निराधारांच्या वैद्यकीय उपचाराचा खर्च भागविणे शक्य नसल्याने तसेच सध्याच्या महागाईत कमी अनुदानात उदरनिर्वाह चालविणेही शक्य नसल्याने त्यांच्या अनुदानात रुपये ७०००/- इतकी वाढ करण्याची मागणी समाज क्रांती आघाडी शाखा, वरोरा यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यामध्ये जुनी पेंशन योजना लागू करण्याबाबत, ७० वर्षावरील वृध्दांना एस.टी. बसमध्ये प्रवासात १०० टक्के सुट मिळण्याबाबत, बेरोजगारांना रोजगार मिळण्याबाबत, खाजगीकरण रद्द करुन त्यांना शासकीय नोकरीत सामावून घेण्याबाबत त्याचप्रमाणे शाळा बंदचे परिपत्रक रद्द करुन शिक्षणाचे खाजगीकरण थांबविणे इ. मागण्यांबाबतचे निवेदन समाज क्रांती आघाडी, वरोरा यांनी मा.मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, चंद्रपूर, उपविभागीय अधिकारी तहसिल कार्यालय, वरोरा यांच्याकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान सादर केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने उक्त मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ (२६-१२-२०२५) :** (१) समाज क्रांती आघाडी, शाखा वरोरा यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना

दिलेल्या निवेदनात असे नमूद केले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना या योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात विभागाच्या दिनांक ५ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये रुपये १०००/- वरुन रुपये १५००/- इतकी वाढ करण्यात आली आहे. तसेच या योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रुपये १५००/- वरुन रुपये २५००/- इतकी वाढ विभागाच्या दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेली असून सदर वाढ माहे, ऑक्टोंबर २०२५ पासून देण्यात येत आहे.

वित्त विभाग अधिसुचना नुसार दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन), १९८२ नियम लागू होणार नाहीत व वित्त विभागाच्या दिनांक ३१.१०.२००५ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेत दिनांक ०१.११.२००५ किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू आहे. तद्नंतर वित्त वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २१.०८.२०१४ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत समाविष्ट केली आहे.

राज्य शासन निर्णय दिनांक२५/०२/२०१६ अन्वये कोणत्याही प्रवास सवलत योजनेमध्ये फेरफार करणे, सुधारणा करणे, सवलत बंद करणे अथवा नवीन प्रवास सवलत योजना सुरु करणे इत्यादी बाबतचे अधिकार गृह विभागास राहतील असे विहीत करण्यात आले आहे. सबब ७० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना एस.टी बसमधून प्रवासात १००% सवलत अनुज्ञेय करणे ही बाब धोरणात्मक असून शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

राज्य शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१९ पासून शहरी व ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी तसेच राज्यातील होतकरु युवक-युवतींसाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) योजना सुरु केली आहे. योजनेची अंमलबजावणी पूर्णत: ऑनलाईन पद्धतीने महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभाग यांचे मार्गदर्शनाने व उद्योग संचालनालयाच्या सनियंत्रणाखाली जिल्हा उद्योग केंद्र व जिल्हा खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्यामार्फत जिल्हास्तरावर राबविण्यात येत आहे.

२० किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय तसेच यासंदर्भात कोणताही शासन निर्णय/शासन अधिसूचना/शासन आदेश शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## वरोरा (जि.चंद्रपूर) येथील क्रीडा संकुलाची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत

**(३९) ४१५८ (०५-०५-२०२५). श्री.करण देवतळे (वरोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा (जि.चंद्रपूर) येथील क्रीडा संकुलामध्ये मनोरंजनाचे कार्यक्रम होत असल्याने क्रीडा प्रशिक्षणामध्ये अडथळा निर्माण झाल्यामुळे शेकडो खेळाडूचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्रीडा संकुलाची दुरवस्था झाल्याने पालकांना आपल्या पाल्यांना पैसे देऊन बाहेरील मैदानावर सरावासाठी पाठवावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्रीडा संकुलमध्ये मनोरंजन कार्यक्रम पूर्णपणे बंद करणे, क्रीडा संकुलाच्या व्यवस्थेकडे लक्ष देऊन अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे, मुलांना धावण्यसाठी ४०० मीटर चा ट्रॅक तयार करणे इत्यादी मागण्या वरोरा येथील क्रीडा संकुलातील खेळाडू विद्यार्थी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०६-१२-२०२५) :** (१), (२) व (३) वरोरा तालुका क्रीडा संकुलाचा वापर खेळाडूंकडून सातत्याने केला जात आहे आणि येथे कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, मैदानी खेळ, धनुर्विद्या आणि क्रिकेटचे मोफत प्रशिक्षण नियमितपणे दिले जात आहे. या क्रीडा संकुलाच्या विस्तारासाठी ४००.०० लक्ष सुधारित अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली आणि रु. २००.०० लक्ष निधी क्रीडा संकुल समितीस वितरित करण्यात आला आहे, या निधीतून सिमेंट काँक्रीट ड्रेनेज, इनडोअर हॉलचे नुतनीकरण आणि जागेच्या मर्यादेमुळे ४०० मीटर धावनपथाची निर्मिती शक्य नसल्यामुळे विद्यमान २०० २०० मीटर रनिंग ट्रॅकचे अपग्रेडेशन केले जात आहे. सन २०२४-२५ या वर्षात फक्त पाच दिवसांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. तथापि, या कालावधीत क्रीडा संकुल सुरु होते त्यामुळे खेळाडूंना कोणता अडथळा आलेला नाही. दिनांक २९.०५.२०२५ रोजी झालेल्या तालुका क्रीडा संकुल समितीच्या बैठकीत, भविष्यात सांस्कृतिक आणि मनोरंजन कार्यक्रमांसाठी क्रीडा संकुल मैदानाचा वापर टाळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहिल्यानगर जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शालांतपूर्व शिष्यवृत्तीबाबत**

**(४०) ४२०४ (२९-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्रीमती सई डहाके (कारंजा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अहिल्यानगर जिल्ह्यात अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शालांतपूर्व शिष्यवृत्तीसाठी बहुतांश माध्यमिक शाळांनी अद्याप ऑनलाईन नोंदणी केली नसल्याने विद्यार्थी या शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले असल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्हयातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत नोंदणी न केल्याने विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहत असल्याने या शाळांची तातडीने नोंदणी करुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील अनुसूचित जातीचे विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (२४-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) शिष्यवृत्तीत वाढ करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेल्या जलशुध्दीकरण केंद्राला जागा मिळण्याबाबत**

**(४१) ४२१६ (२७-०४-२०२५). श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील उजनी ते सोलापूर समांतर जलवाहिनीचे पाणीपुरवठा करण्यासाठीचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वाशियाना येथे दररोज वा एक दिवस आड पाणीपुरवठा करण्याकरिता जलशुद्धीकरण केंद्रासाठी पाकणी येथील उपलब्ध असलेले वन विभागाच्या जागेऐवजी अंधळगाव येथील साडे तीन हेक्टर शासकीय जागा वन विभागास हस्तांतर करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी (सोलापूर) यांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पाठवला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेले जलशुद्धीकरण केंद्राला जागा मिळण्याबाबत शासनाने कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (०९-०१-२०२६) :** (१), (२) व (३) सोलापूर महानगरपालिका क्षेत्रासाठी उजनी धरण जलाशय उद्भव पाणीपुरवठा योजना महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आली असून, जलशुध्दीकरण केंद्रासाठी वनजमिन वळतीकरणाचा प्रस्ताव पर्यायी वनीकरणाच्या प्रस्तावित क्षेत्रासह वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी दिनांक २५.०८.२०२५ च्या पत्रान्वये सादर करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत प्रस्तावावर केंद्र शासनामार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे, हे खरे आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विलेपार्ले परिसरातील विमानतळ प्राधिकरणाच्या फनेल क्षेत्रातील इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(४२) ४२१७ (२८-०४-२०२५). अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विलेपार्ले परिसरातील विमानतळ प्राधिकरणाच्या फनेल क्षेत्रातील इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एअरपोर्ट फ़नेल क्षेत्रामधील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासंबंधी स्वतंत्र नियमावली करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या समितीने अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महापालिकेचा प्रस्ताव व संचालक, नगररचना यांनी अभिप्रायामध्ये पुनर्विकासाबाबत सुचविलेला पर्याय यामध्ये एक वाक्यता नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त अभिप्रायाच्या अनुषंगाने एअरपोर्ट फनेल झोन मधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करणे शक्य होण्याकरिता बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये स्वतंत्र तरतूद अंतर्भूत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) : (**१), (२) व (३) मुबई मधील विमानतळ लगतचा परिसर भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या नियमावलीनुसार फनेल झोनमध्ये येतो. सदर फ़नेल झोनमध्ये विमानांच्या दळणवळणाकरिता भारतीय विमानपत्तन प्राधिकरणामार्फत प्रत्येक इमारतीची कमाल उंची ठरविण्यात येते. त्यामुळे, मुंबईमधील विलेपार्ले भागातील विमानतळाच्या फनेल झोनमधील इमारतीच्या उंचीवर मर्यादा आहे फनेल झोन मधील उचीचे निबंधांमुळे बाधित इमारतींचे पुनर्विकासाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांकडून विनंती करण्यात आल्यानुसार तत्कालिन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक १२/१२/२०१८ रोजी समिती गठीत केली होती. सदर समितीने बैठकी घेऊन तयार केलेला अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केला असून त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने विमानतळ परिसरातील एअरपोर्ट फनेल झोन मधील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत दिनांक ०९/०९/२०२१ रोजीचे पत्राद्वारे

शासनास प्रस्ताव सादर केला आहे. महापालिकेच्या सदरहू प्रस्तावाचे अनुषंगाने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राजु, पुणे यांचे दिनांक ३०/१२/२०२० रोजीचे पत्राद्वारे अभिप्राय/अहवाल प्राप्त झाले असून त्यामध्ये महापालिकेने सादर केलेला प्रस्ताव उचित नसल्याबाबत कळविले असून क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून पुनर्विकासाबाबत शिफारस केली आहे. महापालिकेचे प्रस्तावामध्ये व संचालक, नगररचना यानी अभिप्रायामध्ये पुनर्विकासाबाबत सुचविलेले पर्याय हे भिन्न आहेत.

(४) व (५) बृहन्मुंबई क्षेत्रातील उंचीचे निर्बंध असलेल्या एअरपोर्ट फनेल झोन मधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास सुसह्य व्हावा याकरिता बृहन्मुबई विकास नियत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये त्याबाबत स्वतंत्र तरतूद करण्याकरिता शासनाने मान्यता दिली असून त्यानुसार उक्त नियमावलीचे विनियम ३३ मध्ये खंड २६ अन्वये नव्याने स्वतंत्र तरतूद अंतर्भूत करणेबाबत उक्त नियमावलीमध्ये फेरबदल करणेकरीता शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१कक) अन्वयेची दिनांक २८/०३/२०२५ रोजीची फेरबदलाची सूचना निर्गमित केली असून सदर प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने पुढील वैधानिक कर्यवाही पुर्ण करणेकरिता उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई याची ‘अधिकारी’ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार, नियुक्त अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांनी सदर फेरबदलानुषंगाने वैधानिक कार्यवाही करून दिनांक ०१/०७/२०२५ व दिनांक १८/०७/२०२५ रोजीचे पत्रान्वये नगर रचना संचालनालयामार्फत अहवाल शासन नगर विकास विभागास सादर केला आहे त्यानुषंगाने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर फेरबदलाचे मजूरीचे अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.

---

**ठाणे परिवहन विभागात अनुकंपा तत्वावरील पदे भरण्याबाबत**

**(४३) ४२३८ (०८-०४-२०२५). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे परिवहन विभागात मागिल गेल्या १५ वर्षांपासून अनुकंपा तत्वावरील प्रलंबित असलेल्या नियुक्त्या केल्या जाणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार ९१ पदे भरली जाणार असल्याचे माहितीही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनुकंपा तत्वावरील पदे कधीपर्यंत भरण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पदे लवकर भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :**(१), (२), (३), (४) मोटार वाहन विभागातील अनुकंपा तत्वावरील पदे भरण्याचे कामकाज परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबईयांचे कडून हाताळले जाते. सद्य:स्थितीत ठाणे परिवहन विभागाकडून अनुकंपा नियुक्तीबाबत प्रस्ताव प्रलंबित नाही.

तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ठाणे विभागामध्ये मागील १५ वर्षात १११ उमदेवारांना अनुकंपा तत्त्वावर नेमणूका देण्यात आल्या आहेत. तसेच, चालक - ०२ व सुरक्षा रक्षक - १ अशा एकूण ०३ उमेदवारांना नेमणूकपुर्व वैद्यकीय तपासणीकरीता पाठविण्यात आलेले आहे. वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त होताच त्यांना नेमणूक देण्यात येईल. सद्यस्थितीत अनुकंपा तत्वावर लिपिक-टंकलेखक - ०३, शिपाई - ०२, वाहक - ०१ असे एकूण फक्त ०६ उमेदवार रिक्त जागांअभावी प्रतीक्षा यादीत आहेत.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन ठाणे विभागात लिपिक-टंकलेखक, वाहक व शिपाई पदावर जात प्रवर्ग निहाय जागा रिक्त झाल्यानंतर सदर प्रतीक्षा यादीवरील उमेदवारांना नियुक्ती देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## मुंबई महानगरातील वाहतुकीच्या समस्येबाबत

**(४४) ४२४० (२४-०४-२०२५). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरात वाहतुकीची समस्या वाढली असून उपनगरीय रेल्वेवर वाहतुकीचा ताण पडत असून मुंबईतील रस्त्यांवर खाजगी वाहनांची संख्या वाढू लागल्याने रस्त्यांवरही वाहतूक कोंडी असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरात ३३७ किलोमीटर लांबीचे मेट्रो जाळे उभारण्याचे नियोजन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) केले असून यातील बहुतांश मेट्रो मार्गिकेवरून माहे डिसेंबर २०२४ पर्यंत प्रवासी वाहतूक सुरू होणे अपेक्षित असताना सध्या १४ मेट्रो मार्गिकांपैकी केवळ ३ मार्गिकांवरूनच प्रवासी वाहतूक सुरू झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेट्रो मार्गिकांच्या उभारणीवर भर दिला जात असताना बेस्ट बस सेवा व इतर सार्वजनिक वाहतुकीत सुधारणा तसेच नियंत्रण ठेवण्यासाठी अपेक्षित पावले उचलली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईकरांचा वाहतुक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

जागतिकीकरणाच्या माध्यमातून बदलत्या आर्थिक परिस्थितीमध्ये रस्त्यावरील खाजगी वाहनांची तसेच रिक्षा, टॅक्सी, मोटरसायकल, कार यांची संख्या झपट्याने वाढत असून मुंबई शहरातील वाहतुकीवर परिणाम होत आहे. त्यामुळे मुंबई महानगरातील गर्दीच्या वेळी वाहतुक कोंडी होते ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३), (४) व (५) मुंबई महानगरामध्ये एकूण ३९४ कि.मी. लांबीच्या मेट्रो मार्गाचे जाळे उभारण्याचे नियोजन करण्यात आले असून त्यापैकी २६१.५० कि.मी. लांबीच्या मार्गिकांचे काम हाती घेण्यात आलेले आहे व त्यापैकी मुंबई मेट्रो मार्ग-२अ, ७, मुंबई मेट्रो-३ (अंशत:) व नवी मुंबई मेट्रो भाग-१ या एकूण ८०.१० कि.मी. लांबीच्या मार्गीका वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला आहेत. उर्वरित मेट्रो मार्गावर काम प्रगतीपथावर असून त्या लवकरच कार्यान्वित करण्यात येतील.

बेस्ट उपक्रम गेली अनेक वर्षे मुंबईतील तसेच आसपासच्या शहरातील प्रवाशांना अतिशय किफायतशीर दरात आरामदायी बससेवा कार्यान्वित करीत आहे. मुंबई शहरातील विविध विकास प्रकल्पांच्या अनुषंगाने बेस्ट उपक्रमाने नेहमीच सहकार्याची भूमिका बजावलेली आहे.

मुंबई शहरामध्ये नवीन उड्डाणपूल, पूर्व मुक्त मार्ग यांची उभारणी झाल्यावर देखील बेस्ट उपक्रमाने या मार्गावरून बससेवा कार्यान्वित केलेल्या आहेत. तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या ‘धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारा मार्गा’ वरून देखील उपक्रमाच्यावतीने बससेवा सुरू करण्यात आलेली आहे.

बेस्ट उपक्रमातर्फे बसगाड्यांचे प्रवर्तन करताना प्रवाशांच्या गरजेनुसार आणि मुंबईतील रस्त्यांची स्थिती विचारात घेऊन मिडी, वातानुकूलित, इलेक्ट्रीक अशा वेगवेगळ्या प्रकारच्या बसगाड्या बसताफयात समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. विशेषतः मुंबईतील वाहतूकीची गंभीर समस्या विचारात घेऊन मिडी बसगाड्यांच्या वापराबाबत तसेच भविष्यात उपक्रमाचा संपूर्ण बसताफा इलेक्ट्रीक बसगाड्यांचा करण्याचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. प्रवाशांना योग्य प्रस्थानांतराने बसगाड्या उपलब्ध व्हाव्यात व प्रवाशांचा बसथांब्यांवरील प्रतिक्षाकाळ कमी व्हावा याकरीता बसमार्गांचे सुसूत्रिकरणाचे काम सुरु आहे. प्रवाश्यांच्या सोयीकरिता बस थांब्यांवर प्रत्यक्ष बस गाडी केव्हा उपलब्ध होईल ह्याची माहिती Google Maps वर उपलब्ध करण्यात आली आहे. प्रवाशांच्या सेवेबाबत बेस्ट

उपक्रमाचा दृष्टिकोन नेहमीच सकारात्मक राहीलेला आहे. पायाभूत सेवा-सुविधा आणि साधन सामग्रीच्या उपलब्धतेनुसार बेस्ट उपक्रमाने नेहमीच प्रवाशांना बस सेवा उपलब्ध करुन दिलेली आहे.

---

## वाशिम जिल्ह्यासह अमरावती,यवतमाळ, अकोला, बुलढाणा जिल्हयातील एमआयडीसीतील उद्योजकांचे प्रलंबित मागण्यांबाबत

**(४५) ४३१३ (२४-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हासह अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा जिल्हयातील एमआयडीसी उद्योजकांचे भुखंडाबाबत प्रश्न प्रलंबित असल्याने माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील जिल्हयातील एमआयडीसी विभागात उद्योगांची संख्या मोठया प्रमाणात असून सदरील उद्योजकांचे प्रश्न सोडविण्याबाबत संबंधित विभागीय अधिकारी सहकार्य करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाशिम जिल्हयातील एमआयडीसीमधील ९ ते १३ एकरापर्यंतचे मोठे भूखंड विनावापर असल्याने या भूखंडाची पुनर्रचना करुन ते एक ते तीन हजार स्क्वेअर मीटरचे करुन नवउद्योजकांना उद्योगांसाठी देण्यात यावे अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

वाशिम, अमरावती, यवतमाळ, अकोला तसेच बुलढाणा जिल्हयातील एमआयडीसी उद्योजकांचे प्रश्न प्रलंबित असल्याचे तसेच त्याबाबत तक्रार अर्ज माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

उद्योजकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी संबंधित सोयी सुविधा या एक खिडकी योजनेव्दारे प्रादेशिक कार्यालयांच्या स्तरावर पुरविल्या जात असून, अर्जदारांनी ऑनलाईन पध्दतीने एक खिडकी योजनेव्दारे अर्ज सादर केल्यानंतर विहित वेळेत प्रलंबित अर्जांचा निपटारा हा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत केला जातो.

(३) व (४) अंशतः खरे आहे.

इंडस्ट्रियल असोसिएशन, एमआयडीसी वाशिम यांच्या दिनांक ०९/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये, वाशिम जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये सुक्ष्म उद्योगांना लागणाऱ्या १००० चौ.मी. व २००० चौ.मी. आकाराच्या भूखंडाची आवश्यकता आहे. तथापि, त्या आकाराचे भूखंड एमआयडीसी पंचाळा, जिल्हा वाशिम या ठिकाणी उपलब्ध नसल्याने मोठ्या आकाराच्या भूखंडाची पुर्नरचना करण्यासाठी विनंती केली आहे.

सदर विनंतीच्या अनुषंगाने तसेच सध्यस्थितीत वाशिम औद्योगिक क्षेत्रातील वाटपास उपलब्ध असलेल्या क्षेत्रापैकी शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमातंर्गत ३४.९३ हे. आर क्षेत्रावर MSME Park उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. याबाबतची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर म.औ.वि. महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार शासनाच्या Maha Tender या पोर्टलवर गरजू उद्योजकांना भूखंड वाटपबाबत कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात विशेषत: वाशिम जिल्हयातील नद्यांच्या प्रदूषण आराखड्यांची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(४६) ४३१८ (२७-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: वाशिम जिल्हयातील मोर्णा, पूर्णा, पैनगंगा नद्यांच्या प्रदूषित पट्टयांमध्ये उपाययोजना आराखडा तयार असून मात्र त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आराखड्यास मंजूरी व निधीची तरतूद करुन आराखड्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-११-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

• महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने पुर्णा, मोर्णा व पैनगंगा नदी च्या प्रदूषित पट्टयांमधील पाण्याची गुणवत्ता सुधारण्याकरीता नदी कृती आराखडा तयार केलेला आहे. त्यानुषंगाने सदर कृती आराखड्यानुसार नदीकाठावरील संबंधित स्थानिक संस्थांनी स्वनिधी, शासनाच्या विविध योजनांतर्गत निधीची तरतूद करून आराखड्याची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे.

• त्यानुसार, अमरावती महानगरपालिका क्षेत्रामधून एकुण ९३ द.ल.ली. प्रतिदिन घरगुती सांडपाणी निर्मीत होते. त्यापैकी सदय:स्थितीत एकुण ७४.५ द.ल.ली. घरगुती सांडपाण्यावर अमरावती महानगरपालिकेमार्फत प्रक्रिया करण्यात येत असून उर्वीरत सांडपाणी विनाप्रक्रिया नदीत मिसळते.

• अकोला महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ६४ द.ल.ली. घरगुती सांडपाणी निर्मीत होते. त्यापैकी अकोला महानगरपालिकेमार्फत घरगुती सांडपाण्यावर प्रक्रियाकरण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मदतीने भुमिगत गटार योजनेचे तसेच ३० द.ल.घ.मी. क्षमतेच्या घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा मौजे सिलोडा या ठिकाणी कार्यान्वित करण्यात आलेली आहे. तसेच, अकोला महानगरपालिका क्षेत्रामध्ये पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या जागेवर ७ द.ल.ली. क्षमतेची घरगुती सांडपाणी सयंत्रणा अकोला महानगरपालिकेमार्फत कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

• वाशिम नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये ३.५ द.ल.ली. प्रतिदिन घरगुती सांडपाण्याची निर्मित होते. सदर घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता ८ द.ल.ली क्षमतेची सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणाचे काम पुर्ण झाले असून सदर सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा वाशिम नगरपरिषदेमार्फत कार्यान्वित केलेली आहे.

• शेगांव नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये सुमारे ७.५७ द.ल.ली. प्रतिदिन घरगुती सांडपाण्याची निर्मित होते. त्यापैकी ९.० द.ल.लि. क्षमतेची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा शेगांव नगरपरिषदेमार्फ़त उभारण्यात आली असून ११ द.ल.लि. क्षमतेच्या घरगुती सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे काम शेगांव नगरपरिषदेमार्फ़त प्रगतीपथावर आहे.

• बुलढाणा जिल्हयातील मेहकर नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामधून निर्मित होणारे सुमारे ७.५ द.ल.ली. घरगुती सांडपाणी हे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या विनाप्रक्रिया पैनगंगा नदीत मिसळत असते. त्यानुषंगाने, मेहकर नगरपरिषदेमार्फत १०.द.ल.ली. क्षमतेची घरगुती सांडपाणी प्रक्रीया सयंत्रणा बसविण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजनेचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेकरीता मेहकर नगरपरिषदेकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात महावितरणच्या अभय योजनेला अपुरा प्रतिसाद मिळत असल्याबाबत

**(४७) ४३९७ (२७-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे ३८ लाख ग्राहकांनी वीज देयकाची थकबाकी भरली नसल्याची निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडीत न करता त्यांना दिलासा देण्यासाठी दिनांक १ सप्टेंबर, २०२४ पासून 'अभय योजना' लागू करण्यात आली होती परंतू दोन वेळा मुदतवाढ देऊनही या योजनेला अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने ३७ लाखांहून अधिक ग्राहकांनी ही योजना स्वीकारली नसल्याचे दिनर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, 'अभय योजनेंतर्गत' वीज ग्राहकांनी थकबाकी भरण्याबाबत विशेष मोहिम राबवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

सदर ३७,३६,३२२ ग्राहकांचा विद्युत पुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्यात आलेला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडीत असलेल्या उच्चदाब व लघुदाब ग्राहकांच्या (कृषी आणि सार्वजनिक पाणी पुरवठा ग्राहक वगळून) थकबाकी वसुली करिता "महावितरण अभय योजना-२०२४" ही योजना सुरु केली होती. सदर योजनेचा कालावधी १ सप्टेंबर, २०२४ ते ३० नोव्हेंबर, २०२४ पर्यंत होता. या योजनेचा कालावधी ३१ मार्च, २०२५ पर्यंत वाढवण्यात आला होता. सुमारे १४९८८५ ग्राहकांनी सदर योजनेचा लाभ घेतलेला असून, रुपये २१२.५६ कोटी भरले आहेत.

(३) समाजमाध्यमे, वृत्तपत्रे, स्थानिक केबल टीव्ही, होर्डिंग्स तसेच FM रेडीओद्वारे राज्यपातळीवर या योजनेची व्यापक प्रसिद्धी करण्यात आलेली होती. कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडीत झालेल्या ग्राहकांना क्षेत्रीय कार्यालयामार्फत नोटीस आणि अभय योजनेची माहिती देण्यात आलेली होती. या शिवाय राज्य परिवहन मंडळाच्या १००० बस गाडयावर देखील या योजनेची जाहिरात माहे फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये करण्यात आलेली होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजा गडचांदूर (ता. कोरपना, जि. चंद्रपूर) येथील शासकीय धान्य गोडाऊनची इमारत तोडणेबाबत

**(४८) ४४३१ (२८-०४-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा गडचांदूर (ता. कोरपना, जि. चंद्रपूर) येथील स.क्र.१४६/१आ.८.०६ हे. आर. मधील ०.४३ हे.आर. जागेवरील शासकीय धान्य गोदामाची इमारत तोडण्याची परवानगी देऊन त्या जागेवर नाट्यगृह बांधण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पाठवला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने जागा उपलब्ध करून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०७-१०-२०२५) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

मौजा गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर येथे नाट्यगृह बांधकामासाठी स.क्र.१४६/१ वरील ०.४३ हे.आर. जागेवरील शासकीय धान्य गोदाम तोडण्याचा प्रस्ताव जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक २६.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

(२) कोरपना तालुक्याचे एकूण मासिक नियतन ५८० मे. टन इतके आहे. कोरपना तालुक्यात सन २०१७ मध्ये १०८० मे. टन क्षमतेचे नवीन गोदाम बांधण्यात आले आहे. सदर प्रश्नांकित प्रस्तावाच्या अनुषंगाने शासकीय धान्य गोदाम तोडून प्रस्तुत जागेवर नाट्यगृह बांधण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग अथवा नगर विकास विभागाचा जागा हस्तांतरण करुन देण्यासाठी कोणताही प्रस्ताव शासन स्तरावर अद्याप प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मनोर (ता.जि.पालघर) येथील जंगलात असलेल्या वन्यप्राण्यांचे संरक्षण करण्याबाबत

**(४९) ४४७६ (२५-०४-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर (ता.जि.पालघर) येथील जंगलात रानडुक्कर, ससे व हरिण यांसारख्या वन्यप्राण्यांची बेकायदेशीरपणे शिकार केली जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्यप्राण्यांची शिकार करणाऱ्यांवर कारवाई करण्यास प्रशासनाकडून टाळाटाळ होत असल्यामुळे वन्यप्राण्यांचे जीवन धोक्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वन्यप्राण्यांचे संरक्षण व त्यांची शिकार रोखून त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (१६-०२-२०२६) :**(१) व (२) हे खरे नाही.

दिनांक ०५.०२.२०२५ रोजी लोकसत्ता या मराठी वृत्तपत्रात "प्राणी समजून गोळी झाडल्याने दोघांचा मृत्यु? गावठी कट्टयाद्वारे शिकारी दरम्यानची घटना" या शिर्षकाखाली एक बातमी प्रकाशित झाली होती. मात्र, सदर प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी, बोईसर यांनी स्थळपाहणी/केलेल्या चौकशीत बोईसर वनक्षेत्रात शिकारीचा कोणताही पुरावा सापडलेला नाही.

(३) वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- वन्यजीव सप्ताहादरम्यान कर्मचारी/अधिकारी व संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांद्वारे नागरीकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यात येत आहे.
- वन्यजीवांचे प्रमाण अधिक असलेल्या संवेदनशील वनक्षेत्रामध्ये नियमित गस्त करण्यात येते.
- वनक्षेत्रात नियमित बीट तपासणी करण्यात येत आहे.
- प्रकरणाच्या प्रभावी निरीक्षणासाठी पोलिस विभागाशी समन्वय साधण्यात येत आहे.
- शिकारीचे किंवा इतर गुन्हे आढळून आल्यास टोल फ्री क्रमांक १९२६ वर तात्काळ तक्रार दाखल करणेत यावी याबाबतीत नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यात येत आहे.
- खबऱ्याकडून बातमी काढून त्यानुसार अचानक धाडी टाकण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ऊस वाहतूकदारांच्या समस्यांबाबत**

**(५०) ७८५२ (१९-०८-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऊस वाहतुकदारांची होणारी आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी साखर कारखाना, गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार महामंडळ व शासन या तिघांनी एकत्रित करार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी ऊस तोडणी कामगार पुरवावेत तसेच साखर कारखान्यांनी ॲडव्हान्स वसूलीसाठी ताब्यात घेतलेली वाहने तात्काळ परत करावीत, यासाठी साखर आयुक्त कार्यालय येथे ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य ऊस वाहतूकदार शेतकरी संघटनेने माहे एप्रिल, २०२५ मध्ये दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (१६-०२-२०२६) :** (१) नाही

(२) व (३) महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी जप्त केलेली वाहने परत मिळणेबाबत महाराष्ट्र राज्य ऊस वाहतूकदार शेतकरी संघटना यांच्या प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबतच्या सूचना साखर आयुक्तालयाच्या दिनांक ०४/०८/२०२५ व दिनांक १९/०८/२०२५ रोजीच्या पत्राने सर्व प्रादेशिक सहसंचालकांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.